# देवाचे मूल



# ...कसे व्हावे





साक्ष संस्करण

समाविष्ट: तुमची गोष्ट कशी सांगाल आणि कशी साक्ष द्यावी.

# देवाचे मूल कसे व्हावे

# डेव्हिड हॉवेल

## या सेवाकार्यास मदत करा

प्रिज़न इव्हान्जेलिझम अमेरिकेतील २०,००,००० कैद्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या २१०० तुरुंगासाठी विनामूल्य “देवाचे मूल कसे व्हावे” या पुस्तकाचे मुद्रण आणि वितरण करते. आमचा उद्देश अंतःकरणे बदलणे आणि कारागृह बंद करणे हा आहे. येशू ख्रिस्तावरील विश्वासाने आणि प्रेमाने हे साध्य केले आहे. हृदय बदलल्याशिवाय सत्तर टक्के लोक पाच वर्षांत कैदेत परत जातील.

आम्हाला आर्थिक मदत करून बंदीवानांना कायमचे मुक्त करण्यासाठी मदत करा.

howtobeachildofgod.com या संकेतस्थळावर जाऊन तुम्ही तुमच्या स्वतःच्या सेवाकार्यासाठी पुस्तके खरेदी करू शकता

सर्व नफ्यातून तुरूंगासाठी अधिक पुस्तके खरेदी केली जातात.

prisonevangelism.com या संकेतस्थळावर जाऊन तुम्ही या सेवाकार्यास थेट देणगी देऊ शकताः

Facebook: @ Prison Evangelism, Inc. and @How to be a child of God

You can also mail a check to: Prison Evangelism
PO Box 571977
Houston, Texas 77257

कॉपीराइट © २०१९ डेव्हिड हॉवेल यांच्याकडे

सर्व हक्क राखीव आहेत. डेव्हिड हॉवेलच्या लेखी परवानगीशिवाय या प्रकाशनातील कोणत्याही भागाचे कोणत्याही प्रकारे पुनरुत्पादन केले जाऊ शकत नाही.

हे पुस्तक मोठ्या प्रमाणात शैक्षणिक आणि सुवार्तिक हेतूंसाठी खरेदी केले जाऊ शकते. अधिक माहितीसाठी कृपया प्रकाशकाशी संपर्क साधा.

David Howell

PO Box 571977

Houston, Texas 77257 davidhowell@aol.com

info@HowtobeaChildofGod.com www.HowtobeaChildofGod.com

SEE THIS EBOOK AND WATCH THIS VIDEO

@ WWW.PRISONEVANGELISM.COM

Unless otherwise indicated, all Scripture quotations are taken from the Holy Bible, New Living Translation, copyright Â© 1996, 2004, 2007 by Tyndale House Foundation. Used by permission of Tyndale House Publishers, Inc., Carol Stream, Illinois 60188. All rights reserved.

ISBN: 978-0-578-14157-2

Art direction by John Magee, Houston, Texas JohnMageeDesign.com

All illustrations by Randy Rogers, The Woodlands, Texas artistguy@att.net

# प्रस्तावना

“खरं तर, जर ख्रिस्ताचे आणि त्याच्या वधस्तंभाचे पूर्ण सादरीकरण अगदी सुरुवातीलाच आपल्यासमोर केले गेले तर आपण आपल्या ख्रिस्ती जीवनाच्या पहिल्या दिवसापासून अगदी मोठ्या अनुभवात जाऊ शकतो, जरी त्यातील बऱ्याच गोष्टींचे पूर्ण स्पष्टीकरण नंतर मिळते.

वॉचमन नी, द नॉर्मल ख्रिश्चन लाइफ

जेव्हा आपण येशू ख्रिस्तावर प्रभू, देव, तारणहार आणि जीवन म्हणून विश्वास ठेवतो तेव्हा आपण त्याला आपल्या इच्छेला आणि आपल्या जीवनाला सांभाळण्याचे सांगतो. खरं तर तो आपले जीवन बनतो. आपले रूपांतर; कधी पटकन, कधी हळूहळू होते, परंतु बदल नेहमी होत राहतो. देवाचा आत्मा आपल्यात वस्ती करण्यासाठी येतो आणि आपल्याला पूर्ण, जिवंत आणि संपूर्ण बनवितो. जेव्हा आपण देवावर विश्वास ठेवतो आणि आपली अंतःकरणे त्याला देतो तेव्हा आपले जीवन पूर्वीसारखे राहत नाही तर ते बदलून जाते.

डेव्हिड हॉवेल

देव स्वर्गात होता आणि मनुष्याचे रूप धारण करून तो पृथ्वीवर आला



फिलिप्पै. २:६-८, योहान १:१४, इब्री. १:३, रोम. ८:३ब,
योहान १०:३०, कलस्सै. १:१५, कलस्सै. २:९, इब्री. २:११-१७, मत्तय १:२०-२१


त्याची चमत्कारिक मार्गाने गर्भधारणा केली गेली, परंतु आपण ज्याप्रकारे जन्माला येतो त्याप्रमाणेच तो एका स्त्रीपासून जन्मला.
त्याने असे केले जेणेकरुन आपल्याला त्याच्याबरोबर वैयक्तिक नातेसंबंध प्रस्थापित करता यावे आणि देव आणि मनुष्य म्हणून त्याला ओळखू शकू आणि पिता म्हणून त्याला अधिक चांगल्या प्रकारे समजू शकू.

येशू बालपण आणि पौगंडावस्थेतून गेला, एक व्यवसाय शिकला, आणि जेव्हा त्याची वेळ आली तेव्हा त्याने जे सेवाकार्य करण्यासाठी तो आला होता त्याची सुरुवात करत आपल्या सर्वांना स्वतःला देव व तारणारा म्हणून प्रकट केले.



मत्तय ३:१३-१७, मत्तय ७:२८-२९, मार्क ६:२-३, लूक २:४०, लूक २:४१-४७, लूक २:५२

जेव्हा पृथ्वीवरील त्याचा उद्देश पूर्ण झाला, तेव्हा त्याने स्वतःला वधस्तंभावर



खिळू दिले. त्याचा अपमान व छळ करून त्याला वधस्तंभावर खिळले गेले. येशूने या सर्वात क्रूर मरणाने मरणे निवडले ज्यामुळे तुम्हाला आणि मला आपल्या चुकीच्या कृत्याबद्दल दंड भरावा लागू नये. त्याची इच्छा होती की, तो ज्या गोष्टीतून गेला त्यांच्याशी व त्याच्याशी आपण एकरूप व्हावे.



फक्त देवालाच ज्ञात असलेल्या मार्गांनी, येशू ख्रिस्ताचे बलिदान आणि रक्त आपल्या पापांना धुवून काढण्यास आणि सर्वकाळ आम्हाला शुद्ध करण्यास सक्षम आहे. प्रेमाच्या या एकूण कृत्याने आपल्याला शुद्धता दिली जेणेकरून देव आपल्याला येशूसारखाच त्याचा एक पुत्र म्हणून पाहू शकेल

मत्तय २६:२८-२९, मत्तय २७:५७-६१ , रोम. ५:६, रोम. ८:३, इफिस. १:७, इब्री. २:१४-१५, इब्री. ९:२२, १ पेत्र. २:२४, १ योहान १:७




येशू यासाठी आला की, आपले त्याच्याबरोबर वैयक्तिक नाते संबंध प्रस्थापित होतील आणि आपल्याला तो सार्वकालिक जीवन देईल. सार्वकालिक जीवन म्हणजे ख्रिस्ताचे जीवन. याला सुरुवात आणि शेवटही नाही.

लूक २४:१-७, लूक २४:५०-५१ , योहान १६:२८, इब्री. १:३

हे सर्व का आवश्यक होते? कारण जेव्हा देवाने पहिला मनुष्य, आदाम ह्याला निर्माण केले तेव्हा त्याने त्याला नंदनवनात एक अद्‌भुत जीवन दिले परंतु आदामाने त्याच्या स्वर्गीय पित्याची आज्ञा मोडली.




त्या क्षणापासून मनुष्याला शरीर आणि आत्मा (व्यक्तिमत्व) होते, परंतु आध्यात्मिकरित्या तो देवासाठी मरण पावला होता. तो आता पूर्ण नव्हता आणि म्हणून देवाने राखून ठेवलेल्या आशीर्वादांचा त्यापुढे त्याला अनुभव घेता आला नाही.

उत्पत्ती २:८-९, उत्पत्ती ३:२-६, उत्पत्ती २:१६-१७, उत्पत्ती ३:२३, १ करिंथ. १५:४५-४६

आपल्या पालकांचे मूल म्हणून अगदी आपली कौटुंबिक वंशावळ आदामापर्यंत नेली असता.



आपण एदेन बागेत आदामाबरोबर आध्यात्मिकरित्या मरण पावलो. आपण या वंशाचे ओझे तसेच आपल्या स्वतःच्या पापांचे ओझे आणि पृथ्वीवरील आपल्या आयुष्यात जी भावनिक ओझी आपण उचलतो ती वाहत राहतो. लज्जा, अपराधीपणा, भूतकाळातील समस्या, स्तब्धपणा आणि आपल्या पापांबद्दलच्या आपल्या वाईट भावना आणि चरित्रदोष या कचऱ्यांनी भरलेली ही पिशवी आहे. आपल्याला नवीन वंशाची आणि नवीन कुटुंबाची गरज आहे.

रोम. ३:२३, रोम. ५:१२, रोम. ५:१८अ



एके दिवशी, कोणीतरी एक व्यक्ति आली आणि तिने येशूविषयीची गोष्ट स्पष्ट करून सांगितली की, आपल्या प्रत्येकासाठी मरण पत्करून आणि त्याचे सार्वकालिक जीवन देऊन आपल्याला सार्वकालिक मरणापासून वाचवण्यासाठी तो आला. येशू आपल्या सर्वांना बाहेर पडण्याचा मार्ग दाखवून, संपूर्ण क्षमा, बिनशर्त प्रेम आणि त्याच्याद्वारे अनंतकाळच्या जीवनाच्या आशेच्या अनुभव घेण्याचा मार्ग दाखवून मरण पावला.

यहेज्केल. ३६:२६-२७, प्रेषित. ४:१२, रोम. ५:९, १ करिंथ. १५:५७, २ करिंथ. ५:१८अ, गलती. १:१५-१६, इफिस. २:८-९, १ तीमथ्य. २:५-६

येशू यासाठी देखील आला की, त्याच्याबरोबर असलेल्या नातेसंबंधाद्वारे तुम्हाला आणि मला या पृथ्वीवर शांती व विपुल जीवन प्राप्त व्हावे. जीवनातील समस्यांचा सामना कसा करावा हे तो आपल्याला दाखवू इच्छितो. येशू जगण्याची आशा आणि एक नवीन निर्मिती देऊ इच्छितो. आपले स्वभाविक मार्ग आपल्याला स्वमग्नतेत आणि गोंधळात ठेवतात. त्यातून काहीच साध्य होत नाही.



योहान १०:१०, रोम. ६:१६, रोम. ६:२१ , रोम. ८:३७, इफिस. २:१४, प्रकटी. ३:२०



जेव्हा आपण देवापासून विभक्त होतो तेव्हा आपल्याला शांती मिळत नाही. आपण दररोज करत असलेल्या निवडी स्व-केंद्रित असतात आणि त्या आपल्याला निराश करतात आणि देवाच्या सहभागीतेपासून दूर ठेवतात. आपल्या स्वर्गीय पित्याबरोबर असलेल्या शांततेत एकत्र येण्याची आपली तीव्र तळमळ आहे, परंतु आमचा आध्यात्मिक संबंध कमी पडतो. आपल्या स्वतःच्या "उत्तम विचारसरणीने" आणि चांगल्या हेतूने आपल्याला या गोंधळात टाकले आहे.

उपदेशक ३:११, रोम. ६:१६, लूक १:७८-७९, योहान १६:३३, रोम. ५:१-२, रोम. ८:६

आपण आपल्याला देवापासून वेगळे करणारी दरी मिटवण्याचा प्रयत्न करतो आणि त्याच्याबरोबर नातेसंबंध पुन्हा स्थापित करण्याचा मार्ग शोधतो. यापैकी एकही गोष्ट साध्य होत नाही. फक्त येशू ख्रिस्तावरील विश्वासाद्वारे आपण देवपिताशी संपर्क साधू शकतो.




नीति. १४:१२, रोम. ६:२३, रोम. ३:२३



हाच तो येशू आहे जो आपल्या सर्व पापांकरिता, दोषांसाठी व चारित्र्य दोषांसाठी मरण पावला; भूतकाळातील, वर्तमानातील आणि भविष्यातील. त्याच्या रक्ताद्वारे आपण शुद्ध होऊ शकतो आणि देवासमोर उभे राहण्यालायक होतो. आपण देवपित्याकडून संपूर्ण क्षमा आणि अटविरहित प्रेम प्राप्त करू शकतो. येशूने त्याच्या मरणाद्वारे आणि पुनरुत्थानाद्वारे, देव आणि मानव यांच्यातील दरी भरून काढली. म्हणूनच तो जगाचा तारणारा आहे.

योहान. ३:१६, १ पेत्र. ३:१८, १ तीमथ्य. २:५-६, रोम. ५:१

आपल्या सर्वांना हे सत्य स्वीकारण्याची किंवा नाकारण्याची संधी आहे. जर आपण या घटनांना सत्य म्हणून स्वीकारले आणि येशूवर देव म्हणून विश्वास ठेवला तर आपण येशूला असलेल्या सर्व हक्क व विशेषाधिकारांसह देवाची मुले बनतो. आपण सह-वारसदार व येशू ख्रिस्ताचे भाऊ किंवा बहीण बनतो. आपली इच्छा आणि आपले जीवन त्याच्याकडे पूर्णपणे सुपूर्त करा. हे गुंतागुंतीचे नाही परंतु तुम्ही आतापर्यंत केलेल्या सर्वात कठीण गोष्टींपैकी एक असू शकते. जर तुम्हाला खरोखरच देवाची अभिवचने आणि त्याच्याबरोबरच्या सहवासामुळे प्राप्त होणारा आनंद अनुभवण्याची इच्छा असेल तर त्याला तुमच्या जीवनावर नियंत्रण घेण्याची विनंती करा. जर तुम्ही प्रामाणिक आहात तर सर्वात सोपी प्रार्थना देखील पुरेशी आहे ... कारण देव आपले हृदय पाहतो. या साध्या प्रार्थनेने स्वत: ला त्यास द्या. जेव्हा तुम्ही विश्वास आणि भरवसा ठेवता तेव्हा याच गोष्टींची आवश्यकता आहे!



इफिस. २:१३, योहान. १४:६, इब्री. ४:३, इब्री. ४:७

“स्वर्गीय बापा, मी स्वत: ला तुझ्या हाती सोपवतो ---- मला बदलण्यासाठी आणि तुझ्या इच्छेप्रमाणे माझ्या बाबतीत घडून येण्यासाठी. माझ्या जीवनाचा ताबा घे आणि मला माझ्या स्वार्थीपणापासून मुक्त कर यासाठी की मी तुझे व्हावे. मला माझ्या पापावर विजय दे, जेणेकरून मी तुझ्या सामर्थ्याद्वारे आणि तुझ्या प्रीतीद्वारे मी ज्या लोकांना मदत करणार आहे त्यांच्यासाठी मी एक उदाहरण व्हावे. मी तुझ्या जीवनमार्गाला शरण येतो. मी तुझ्यावर विश्वास ठेवतो आणि तुझ्या इच्छेप्रमाणे वागतो. प्रभू येशू ये आणि माझ्याद्वारे आपले जीवन जग. आमेन. ”



आपल्या मुखाने कबूल करा आणि आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवा की, येशू मरण पावला, पुरला गेला आणि पुन्हा जिवंत झाला. त्याच्यावर विश्वास ठेवा की, तो देहधारण केलेला देव आहे आणि देवाचे मूल व ख्रिस्ताबरोबर सह-वारसदार व्हा

योहान ११:२५-२६, योहान १४:६-७, रोम. १०:९, रोम. १०:१३, १ करिंथ. ६:१७ इफिस. १:५-८, इफिस. २:८-१०, कलस्सै. २:६-७, १ योहान. ५:१२-१३

जेव्हा तुम्ही देवाचा आत्मा प्राप्त करता तेव्हा तुम्ही देवासाठी संपूर्ण आणि जिवंत बनता.



जेव्हा तुम्ही येशू ख्रिस्ताला तुमच्या जीवनात येण्यास सांगता तेव्हा तुम्ही आदामातील आपल्या पृथ्वीवरील वंशातून ख्रिस्ताच्या सार्वकालिक जीवनात, **जे जीवन भूतकाळात आणि भविष्यात कायमचे आहे** तेथे रुपांतरित होता. तुम्ही स्वतःला वधस्तंभावर खिळता आणि जुना मनुष्य ख्रिस्ताबरोबर मरतो.



रोम. ५:१८-१९, रोम. ८:१-२, १ करिंथ. १५:२२, गलती. ५:२४, इफिस. १:१३-१४, इफिस. ३:१४-१५, १ पेत्र. १:१८-१९



तुम्ही त्याच्याबरोबर एक होता. तुम्ही ख्रिस्ताबरोबर एकरूप आहात आणि ते कधीही बदलणार नाही. येशू आता तुमच्यामध्ये आणि तुम्ही त्याच्यामध्ये राहता. तो जिथे कुठे जातो तेथे तुम्ही जाता. तुम्ही जेथे कुठे जातात तिथे तो जातो.

योहान. १४:२०, रोम. ६:६, गलती. २:२०, गलती. ४:४-७, गलती. ५:२४, इफिस. १:११ , कलस्सै. २:१०




योहान ३:६, योहान ११:२५-२६, रोम. ५:५, रोम. ६:४-६, रोम. ८:१०, कलस्सै. २:१२-१४, कलस्सै. ३:१-३, इफिस. १:१३ब , इफिस. २:६



जर तुम्ही प्रामाणिकपणे प्रार्थना केली आहे तर तुम्ही आता नवीन कुटुंबाचे --- देवाच्या कुटुंबाचे सदस्य आहात. देवपिता आपल्या सर्वांना त्याची मुले म्हणून दत्तक घेतो आणि आपण आपला थोरला भाऊ येशू याच्यासह सह-वारसदार होतो. तो आपल्याला स्वीकारतो आणि त्याच्या कुटुंबाचा एक भाग म्हणून आपल्यावर बिनशर्त प्रीती करतो. तुम्ही देवाचे पुत्र आहात!

स्तोत्र. १६:११, रोम. ५:११ , रोम. ८:१५-१७अ, २ करिंथ. ५:१७, फिलिप्पै. ३:२०अ, इब्री. २:११-१२, प्रकटी. २१:२

ख्रिस्ताने वाहिलेल्या पापांच्या ओझ्यासह तुमचा जुना मनुष्य वधस्तंभावर मरण पावला आहे. तुम्ही आरामाचा अनुभव घेऊ शकता यापुढे तुम्हाला पाप, व्यसन आणि मनुष्याच्या इतर स्वार्थी मार्गांच्या बंधनात राहण्याची आवश्यकता नाही. तुम्ही ख्रिस्ताबरोबर मरण पावला आणि यापुढे मृत्यू तुम्हाला धमकावू शकत नाही कारण सैतानाचे भीतीचे शस्त्र कुचकामी ठरत आहे.



या नवीन सार्वकालीक जीवनासह एक नवीन धैर्य आणि एक नवीन धाडस येते. मृत्यूचा तुमच्यावर प्रभाव आणि प्रभुत्व राहणार नाही. ख्रिस्त आपली फसवणूक, चोरी, लबाडी आणि इतर गोष्टींच्या अनेक पापांसाठी मरण पावला. आपला पापी स्वभाव सोडून देण्यासाठी आपण त्याच्याबरोबर मरण पावलो आहे. आपल्याला आपल्या मार्गाने किंवा देवाच्या मार्गाने गोष्टी करण्याच्या निवडीचे स्वातंत्र्य आहे. आपण येशू ख्रिस्ताद्वारे आपली इच्छा व आपले जीवन देवाच्या हाती सोपवण्याच्या पूर्वी आपल्याकडे हा पर्याय नव्हता.

रोम. ६:११-१३, रोम. ८:१-२, रोम. ८:१५-१७अ , गलती. ५:१६, कलस्सै. २:६-७, २ तीमथ्य १:७, इब्री. २:१४-१५



आपली शरीरे आणि आत्मा आपली व्यक्तिमत्त्वे अद्यापही पृथ्वीवर हे जीवन जगत असल्यामुळे आपल्याला या सत्याचे पूर्ण आकलन होणे कठीण आहे. परंतु आता ख्रिस्ताचा आत्मा आपल्यामध्ये राहतो आणि आपण आध्यात्मिक जीव आहोत. जर प्रभू इच्छितो ते विपुल जीवन आपल्याला हवे असेल तर आपण या घटना विश्वासाने स्वीकारल्या पाहिजेत. तुमची विचारसरणी बदला आणि तुम्ही कोण आणि कोठे आहात याचा विचार करा. या पृथ्वीवरील आपल्या दैनंदिन जीवनात ज्या कचऱ्या समान गोष्टी आहेत त्यावर नव्हे तर आपल्या पित्याबरोबर स्वर्गातील गोष्टींवर लक्ष केंद्रित करा. देवाच्या कुटुंबात राहताना तुम्हाला शुद्ध आनंद मिळेल. तुमच्यातील जुना मनुष्य मरण पावला आहे आणि येशू ख्रिस्तामध्ये तुम्हाला नवीन जीवन आहे. हा विचार करण्याचा संपूर्ण नवीन मार्ग आहे. तुम्ही रूपांतरित झाले आहात!

रोम. ८:५-६, रोम. १२:२, १ करिंथ. २:१६, इफिस. २:६,
फिलिप्पै. २:५, फिलिप्पै. ३:२०अ, फिलिप्पै. ४:६-८, कलस्सै. ३:१-३, २ तीमथ्य. १:७

आपला वारसा एकतर आपले जैविक पालक आणि आदाम ह्यांच्या वंशात आहे किंवा तो देवाच्या कुटुंबात आहे. इतर पर्याय नाहीत. येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याशिवाय आपल्यातील प्रत्येकजण आदामात राहतो.



बऱ्याच विश्वासणाऱ्यांचे मत आहे की, ते त्यांचा एक पाय आदामाच्या वंशात (किंवा आपल्या पृथ्वीवरील जगात) आणि दुसरा पाय देवाच्या कुटुंबात ठेऊ शकतात. याचा परिणाम म्हणजे अंतर्गत संघर्ष आणि आध्यात्मिक अशांतता. स्पष्ट निवड करण्यात अयशस्वी झाल्याने आपण गोंधळात पडतो आणि देवाकडे आपल्यासाठी जो विजय आहे त्यात आपण कमी पडतो.

मत्तय ७:१३-१४, रोम. ६:१६, रोम. ७:१४-२५, रोम. ८:१-२, १ करिंथ. १५:२२, गलती. ५:१६, फिलिप्पै. ३:२०

ज्याप्रमाणे देव तीन व्यक्तींमध्ये आहे (पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा) आपणसुद्धा तीन आयाम आहोत. आपण आपल्या संवेदनांद्वारे पर्यावरणाशी संबंधित असलेल्या शरीरात राहतो. आपल्याला जीव आहे जी आपली व्यक्तिमत्त्वे आहेत ज्यात आपले मन, इच्छाशक्ती आणि भावना असतात. आणि आपण आत्मा आहोत आता वधस्तंभावर त्याच्याबरोबरच्या मरणाने, पुरले जाण्याद्वारे आणि पुनरुत्थानाद्वारेच्या ज्ञानाने आणि त्याच्यावरील विश्वासाने जागृत झालो आहोत. आपले आध्यात्मिक परिमाण परमेश्वराशी संबंधित असलेला आपला एक भाग आहे जो देवाशी जोडला गेला आहे.



उत्पत्ती २:७, मत्तय ३:१३-१७, योहान. ३:६, रोम. ८:१०, १ करिंथ. ३:१६ -१८,
१ थेस्सलनी. ५:२३ -२४, इब्री. ४:१२

आपली भूमिका पूर्णपणे आणि पूर्णपणे येशू ख्रिस्ताला शरण जाणे आहे. त्याची इच्छा आहे की त्याने त्याचे जीवन आपल्यामध्ये आणि आपल्याद्वारे जगावे जेणेकरून या पृथ्वीवरील त्याचा उद्देश पूर्ण होईल.



आपण खरोखरच ख्रिस्ताचे शरीर आहोत आणि आपल्यातील प्रत्येकाचा उपयोग इतरांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि कौटुंबिक विस्तारासाठी करण्याची त्याची इच्छा आहे. देवाच्या कुटुंबात आपले स्वागत आहे. तुम्ही एक नवी उत्पत्ती आहात! जुन्या मनुष्याला “अलविदा” म्हणा आणि आपल्यामध्ये राहत असलेल्या नवीन आत्म्यास “तुझे स्वागत आहे” असे म्हणा, तुमच्या मध्ये येशू ख्रिस्त राहत आहे.

रोम. ६:११-१३, रोम. ८:१०, रोम. १२:१, रोम. १२:४-५, १ करिंथ. ३:१६, १ करिंथ. ६:१९-२०, २ करिंथ. ५:१६-२१ , इफिस. ४:२१-२४, फिलिप्पै. २:५-८, कलस्सै. १:२७, १ योहान. ३:१-३, १ योहान. ३:९-१०, १ योहान. ५:१८-१९

देवाचे मूल आणि येशूचा सह-वारस म्हणून, आपण त्याच्याबरोबर वारसाचे भागीदार होतो आणि आपल्याला विपुल जीवनाची झलक प्राप्त होते. तुमच्यामधील त्याच्या नवीन आत्म्याने, तुमच्यात देवाच्या मार्गांबद्दल अधिक जाणून घेण्याची इच्छा निर्माण होईल जेणेकरुन तुम्ही त्याचे अनुसरण करू शकाल. देवाने आपला पुत्र येशू याच्याद्वारे स्वतःला प्रकट केले आहे. म्हणून त्याच्याविषयी तुम्हाला शक्य होईल ते सर्व जाणून घ्या. एक पवित्र शास्त्र मिळवा आणि येशूच्या जीवनाविषयी नवीन करारात वाचा. योहानकृत शुभवर्तमानापासून सुरुवात केल्यास अधिक चांगले. जुन्या करारातील उत्पत्तीच्या पुस्तकातील पहिल्या बारा अध्यायांत हे सर्व कसे सुरू झाले हे स्पष्ट केले आहे. या पुस्तकाच्या पानांच्या तळाशी असलेले संदर्भ तुमच्या स्वतःच्या पवित्र शास्त्रात तपासा किंवा प्रत्येक पृष्ठावर जे म्हटले आहे ते चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी या पुस्तकाच्या संदर्भ विभागात पवित्रशास्त्रातील वचने पहा.



- दररोज आपल्या नवीन पित्याशी प्रार्थनेद्वारे बोला. तुमच्या नवीन जीवनासाठी आणि नवीन कुटुंबासाठी त्याचे आभार माना. एखाद्या मित्राप्रमाणे उघडपणे आणि घनिष्ठतेने त्याच्याशी बोला, असा विचार करा की जणूकाही तो तुमच्या शेजारी बसला आहे. येशूच्या रूपात त्याची कल्पना करा, त्याला तुम्ही मोठा भाऊ म्हणून संबोधू शकता.
- पवित्र शास्त्र वाचा. आता आपल्यामध्ये एक नवीन आत्मा, देवाचा आत्मा आहे, तेव्हा पवित्र शास्त्राचा अर्थ काय आहे याविषयी तुम्हाला एक नवीन समज प्राप्त होईल. पवित्र शास्त्रातील वचने देवाची वचने आहेत त्याद्वारे तुमचा नवीन पिता तुमच्याशी बोलतो. तुम्ही कधीही कल्पना करू शकत नाही त्यापेक्षा तो तुमच्यावर जास्त प्रीती करतो.
- एक चर्च, मंडळी किंवा बायबल अभ्यासाची सभा शोधा जिथे तुम्ही इतरांना भेटू शकाल आणि तुमचा विश्वास वाढत असताना तुम्हाला समर्पित राहण्यास मदत होईल. तुमचा स्वर्गीय पिता तुमच्याशी इतर विश्वासणाऱ्यांच्याद्वारे वारंवार बोलतो.
- येशूला जीवन समर्पित केल्यानंतर तुम्ही लवकरात लवकर पाण्याने बाप्तिस्मा घेतला पाहिजे. ही त्याचे अनुकरण, आज्ञापालन आणि त्याच्याशी समरूप होण्याची कृती आहे.
- ख्रिस्ती विश्वासांमध्ये प्रायोजक मिळवा, एखादी अशी व्यक्ती जी तुम्हाला प्रशिक्षित करेल किंवा असा एक मार्गदर्शक त्याच्यापासून तुम्ही शिकू शकाल आणि ज्याच्याशी तुम्ही हिशोबी रहाल.
- तुमच्या येशूवरील नवीन विश्वासाबद्दल इतरांना सांगा.
- आम्ही तुम्हाला एक पवित्र शास्त्र खरेदी करण्याची शिफारस करतो. विशेषतः, बायबल सोसायटी ऑफ इंडिया द्वारे प्रकाशित मराठी बायबल.

देव तुमचा आध्यात्मिक प्रवास आशीर्वादित करो!

यहोशवा १:८, मत्तय ३:१३-१७, मत्तय ७:७-८, मत्तय १०:३२, योहान १४:१३-१४, योहान १५:७, फिलिप्पै. ४:६-७, इब्री. ४:१२, याकोब. ५:१५-१६, १ योहान. १:९

देवाची उत्तम, ग्रहणीय व परिपूर्ण इच्छा काय आहे हे तुम्ही समजून घ्यावे, म्हणून ह्या युगाबरोबर समरूप होऊ नका, तर आपल्या मनाच्या नवीकरणाने स्वत:चे रूपांतर होऊ द्या.

रोम. १२:२



मी जिवंत आहे म्हणून तुम्हीही जिवंत राहाल. त्या दिवशी तुम्हांला समजेल की, मी आपल्या पित्यामध्ये आहे, व तुम्ही माझ्यामध्ये व मी तुमच्यामध्ये आहे.

योहान. १४:१९ब-२०



आम्ही त्याच्याबरोबर वधस्तंभावर खिळले गेलो, त्याच्याबरोबर पुरले गेलो आणि त्याच्याबरोबर उठलो, आणि आता आपण त्याच्याबरोबर देवाच्या सानिध्यात बसलो आहोत.



आणि ख्रिस्त येशूच्या ठायी त्याच्याचबरोबर उठवले व त्याच्याचबरोबर स्वर्गात बसवले गेले आहोत.

इफिस. २:६



मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे; आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो; आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे; त्याने माझ्यावर प्रीती केली व स्वत:ला माझ्याकरता दिले.

गलती. २:२०

# आता तुम्ही देवाचे मूल आहात. . .

देवाचे नवीन मूल या नात्याने, तुम्हाला त्याचा पुत्र किंवा कन्या होण्याचे सर्व विशेषाधिकार आहेत. तुम्हाला त्याच्याबरोबर सहभागिता करता येते, त्याला पिता म्हणता येते, तुम्ही त्याच्या मांडीवर बसू शकता, आपले अंतःकरण त्याच्यापुढे मोकळे करू शकता आणि तुम्ही त्याला तुमचा प्रेमळ पिता, सहकारी, मित्र, प्रदाता आणि विश्वासपात्र बनू द्या. विशेषाधिकारांसह जबाबदाऱ्या देखील आहेत आणि त्यापैकी काही पुढील पृष्ठांमध्ये स्पष्ट केल्या जातील. तुम्ही ख्रिस्ताला प्राप्त केल्यानंतर लवकरच जाऊन एखाद्याला त्याच्याबद्दल सांगावे अशी तुम्हाला आज्ञा करण्यात आली आहे.

**जो कोणी माणसांसमोर मला पत्करील त्याला मीही आपल्या स्वर्गातील पित्यासमोर पत्करीन. मत्तय १०:३२**

समस्या अशी आहे की, आपल्या ते कसे करावे हे खरोखर शिकवले जात नाही, परंतु ही प्रक्रिया सोपी आहे आणि **तुमची गोष्ट/साक्ष कशी सांगाल** याबद्दल पुढील काही पृष्ठांमध्ये स्पष्टीकरण केले आहे. इच्छुक असणे ही मुख्य चावी आहे आणि तुम्ही प्रामाणिकपणे प्रार्थना करून येशूला आपल्या इच्छेवर आणि जीवनावर ताबा घेण्यास सांगितले असेल तर संकल्पना साधी सोपी आहे. या क्षणी तो तुमच्यात आहे आणि तुमची विचार करण्याची, निर्णय घेण्याची, अनुभव घेण्याची पद्धत बदलत आहे. **मी आंधळा होतो आणि आता मला पाहता येते (योहान. ९:२५)** एवढी सोपी ही संकल्पना आहे. जेव्हा तुम्ही तुमची गोष्ट / साक्ष सांगता तेव्हा तुम्ही आज्ञाधारक होता आणि तुम्ही देवाच्या इच्छेप्रमाणे वागता. आपल्या तुमच्या नवीन जीवनात प्रवेश करत आहात. लक्षात ठेवा,तुम्ही नाही मराठी नाही, तर ख्रिस्त तुमच्यामध्ये आहे, म्हणून तयार राहा आणि त्याला बोलू द्या.



# . . . पुढे पाठवा!

इतरांना येशू ख्रिस्ताबद्दल सांगण्याची आणि देवाच्या राज्याची वाढ करण्याची आज्ञा देखील आपला देण्यात आली आहे **(कारण मनुष्याचा पुत्र 'हरवलेले शोधण्यास व तारण्यास आला आहे. लूक १९:१०)** तुम्ही ख्रिस्ताचे शरीर आहात आणि पुढील काही पानांवरील सूचनांसह हे कार्य करू शकता. याची चावी ही उपलब्धता आहे. तुम्ही स्वत: ला उपलब्ध करून दिले पाहिजे जेणेकरून येशू ख्रिस्त तुमच्यात राहण्याद्वारे इतरांपर्यंत पोहचू शकेल. तो कदाचित तुम्हाला बाहेर जाऊन अनोळखी लोकांशी बोलण्यास सांगणार नाही, परंतु तुम्ही आधीपासूनच ज्या लोकांना ओळखत आहे त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी, त्यांना दररोज भेटण्यासाठी तो तुम्हाला सांगेल. त्याने आधीच त्यांना निवडले आहे आणि जेव्हा तुम्ही एखाद्याला येशूबद्दल सांगू इच्छित आहात अशी कल्पना करता तेव्हा तुम्ही ख्रिस्ताच्या मनाने विचार करण्यास सुरवात करता. **कशाप्रकारे साक्ष सांगावी** हा विभाग तुम्हाला शिकवतो की, कशाप्रकारे इतरांना तुम्ही येशू ख्रिस्ताची ओळख करून देऊन देवाबरोबर शांती प्राप्त करण्याचा त्यांना मदत करू शकता. सूचना कठीण नाहीत. यासाठी फक्त तुमच्यात असलेला इच्छुकपणा आणि येशु ख्रिस्ताला तुमच्याद्वारे त्याचे जीवन जगू देण्याची इच्छा आवश्यक आहे.



**तर सर्वांत प्रथम हा बोध मी करतो की, सर्व माणसांसाठी प्रार्थना करा. देवाला त्यांची मदत करण्यास सांगा: त्यांच्या वतीने मध्यस्थी करा आणि त्यांचे आभार माना. १ तीमथ्य. २:१**




"मी पूर्वी आंधळा होतो व आता मला दिसते."
योहान ९:२५

# तुमची गोष्ट /साक्ष कशी सांगाल
## वैयक्तिक साक्षद्वारे ख्रिस्ती लोक साक्ष सांगतात

तुम्ही येशू ख्रिस्ताला ओळखता आणि त्याच्यावर विश्वास ठेवता हे सांगणे म्हणजे वैयक्तिक सुवार्ता प्रसाराची पहिली पायरी आहे. वैयक्तिक साक्ष दोन प्रकारची आहे. एक ऐतिहासिक आहे, जिच्यात तुम्ही येशू ख्रिस्तावर प्रभू आणि देव आणि आपल्या आत्म्याचा तारणहार म्हणून विश्वास ठेवला त्यापूर्वी, त्यादरम्यान आणि त्यानंतर तुमचे जीवन कसे होते ते तुम्ही सांगता. दुसरी विषयानुसार असलेली साक्ष आहे आणि कदाचित तुमचे तारण झाले ती घटना असेल आणि त्या काळापासून तुमच्या जीवनात काय परिवर्तन झाले हे त्यात असेल. हे अशा व्यक्तीसाठी असू शकते जो ख्रिस्ताकडे लहानपणी आला होता आणि परिवर्तन झाल्यानंतरच्या जीवनाविषयी तो सांगू शकेल. दुसरे उदाहरण म्हणजे एखादी अशी व्यक्ती असू शकते जी जीवनभर ख्रिस्ती होती पण नंतर तिच्या लक्षात आले की तो / ती खरोखर देवाला ओळखत नाही आणि मग त्याने/ तिने आत्मसमर्पण व पश्चात्ताप केला.

*तुमच्या विषयातील काही सामान्य गोष्टींचा उल्लेख करून साक्ष सांगण्यास सुरुवात करा; समान गाव, समान नोकरी, समान शाळा इ. काही परस्पर स्वारस्ये शोधा.*

# हे कसे होते

तुमची गोष्ट / साक्ष सांगताना, तुम्ही त्या मार्गाची पुनरावृत्ती करता आणि थोडक्यात सांगता की, त्यामुळे तुम्हाला तुमची जीवनशैली आणि विचारसरणी बदलण्याची इच्छा निर्माण झाली. आपण सर्वांनी आपल्या आयुष्यात वाईट निर्णय घेतले आहेत आणि चुकीच्या निवडी केल्या आहेत ज्या आपण करायला नको होत्या असे वाटते आणि म्हणून त्या पुन्हा कराव्या अशीही इच्छा निर्माण होते. जर आपल्याला त्या गोष्टी जगण्याची पुन्हा संधी मिळाली असती तर. कधीकधी, ती घटनांची मालिका असू शकते किंवा एखादी मोठी चूक किंवा एखादी अनपेक्षित घटना असू शकते जी आपल्याला आपल्या जीवनाचा पुनर्विचार करण्यास भाग पाडते. परिस्थिती काहीही असो, आपल्या कृतीचा किंवा वागण्याचा परिणाम हा उत्प्रेरक असू शकतो जो आपल्याला स्वतःच्या शेवटाकडे नेतो. हीच ती वेळ असते जेव्हा तुमच्या लक्षात येते की तुम्ही यापुढे अशाच प्रकारे कार्य करू शकत नाही आणि म्हणून बदल होणे आवश्यक आहे नाहीतर तुम्हाला त्याची मोठी किंमत मोजावी लागेल. तुम्ही कदाचित आधीपासूनच या टप्प्यावर पोहोचला असाल आणि परिणाम भोगत असाल. आपल्यापैकी बरेच जण आपल्या जीवन प्रवासात अशा ठिकाणी येऊन पोहोचतात जेव्हा आपल्या लक्षात येते की आपण यापुढे स्वत: वर अवलंबून राहू शकत नाही. आपण स्वतःहून काही करू शकत नाही. खरा देव कोण आहे हे शोधण्याची आणि आपली भूमिका सोडून देण्याची आपल्याला गरज आहे.



# काय झालं



जेव्हा आपण स्वतःला नम्र करतो आणि आपल्या लक्षात येते की, आपण विश्वाचे मालक नाही तेव्हा आपण आपले पर्याय शोधू लागतो. विचित्र आणि चमत्कारिक मार्गाने, एक उद्घोषक दिसतो, जो आपल्याला उत्तम आणि सार्वकालिक जीवनाविषयी आणि देवासोबतच्या शांतीबद्दल सांगतो. ती व्यक्ती आपला मित्र किंवा नातेवाईक किंवा मूल, भाऊ, बहीण किंवा मित्राच्या रूपात असू शकते. तो तुम्हाला चर्चला किंवा पवित्र शास्त्र अभ्यासाला येण्यास विचारेल.

तो कदाचित तुम्हाला साक्ष सांगेल (त्याची स्वत: ची वैयक्तिक साक्ष) आणि तुमच्या समस्यांकडे अधिक आध्यात्मिक दृष्टिकोनातून पाहण्याचा सल्ला देईल जसे की येशूला प्रथम शोधण्याचा आणि पूर्वीसारखे जीवन पुढे नेण्यासाठी तुम्ही समर्थ नसल्याचे कबूल करणे. परंतु जेव्हा आपण देवाचा शोध घेता तेव्हा



काहीतरी तुमचे लक्ष वेधून घेते आणि त्याला शरण जाण्यासाठी आणि नवीन जीवनशैली स्वीकारण्यासाठी तुम्ही तयार होता. तुम्हाला देवाचे मूल व्हायचे आहे आणि साध्य केले जाऊ शकते अशा सर्व प्रकारांमध्ये. ते तुमच्या बाबतीत घडून येते. तुम्ही प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवला आहे आणि तुम्ही त्याला तुमच्या इच्छेवर आणि जीवनावर ताबा घेण्यास सांगितले आहे. नवीन जीवन सुरू झाले आहे.

## हे कसे आहे

तुम्ही देवाचे मूल, नव्याने जन्म झालेला विश्वासणारा झाला आहात. तुम्ही प्रभू येशू ख्रिस्तावर आता प्रेम करत आहात आणि तुम्ही त्याच्यावर तुमचा प्रभू, देव, आणि तारणारा म्हणून विश्वास ठेवला आहे. तुमचे जीवन बदलले आहे आणि आता तुम्ही नवीन वृत्ती आणि मूल्यांच्या नवीन संचासह मार्गावर आला आहात. तुम्हाला आता तुमच्या स्वर्गीय पित्याला हिशोब द्यायचा आहे. या विभागात तुम्ही आपले जीवन कसे बदलले आहे आणि तुमची विचारसरणी व तुमचे व्यक्तिमत्त्व कसे बदलले आहे याची आठवण करा. जीवनातील अडचणींना सामोरे जाण्यासाठी देवाची



कृपा कशी सुसज्ज आहे आणि देवाचा आत्मा तुम्हाला योग्य गोष्टी करण्यास कसा प्रवृत्त करतो आणि तुम्ही चुकीच्या मार्गावर जात असताना तुम्हाला तो कसे सुधारतो हे स्पष्ट करा. तुम्ही या विभागात चांगल्या-वाईट गोष्टी स्पष्ट करू शकता. आपल्याला माहित आहे की हे नेहमीच चांगले नसते. महत्त्वाची गोष्ट अशी आहे की तुमच्यामध्ये ख्रिस्त एक काम करीत आहे आणि तुम्ही प्रगतीपथावर असलेले काम आहात.

# पुढे काय



येथून पुढे आपण ख्रिस्तामध्ये वाढतो. कधीकधी रस्ता खडबडीत आणि खड्ड्यांनी भरलेला असतो, परंतु आपल्यासमोर येणारे अडथळे आणि समस्या सोडविण्यासाठी आपल्याकडे नवीन साधने आहेत. आपल्याला मार्ग दाखविण्यासाठी आणि जुन्या जीवनातील चुकीच्या निवडी करण्यापासून आपल्याला वाचवण्यासाठी आपल्यात पवित्र आत्म्याद्वारे देवाचे सामर्थ्य आहे. आपण पवित्र शास्त्राचा अभ्यास करतो आणि ख्रिस्ताचे मार्ग आणि शिष्टाचार शिकून त्याचे अनुकरण करण्यास शिकतो. आपल्याला हे समजून येते की, जेव्हा ख्रिस्त मरण पावला तेव्हा आपला जुना मनुष्य त्याच्याबरोबर मरण पावला आणि आपण आता नवीन उत्पत्ती आहोत.



आपल्याला फक्त हे जाणून घेणे आणि समजणे आवश्यक आहे की, येशू ख्रिस्त आपल्यामध्ये राहतो आणि हे मूलभूत सत्य योग्य आहे ज्यामुळे आपण तारले जात आहोत आणि त्याच्या प्रतिमेत आपण रूपांतरित केले जात आहोत. तुम्ही ख्रिस्ती म्हणून परिपक्व होत असता पुनरुत्थित तारणहारचे अनुकरण करण्यास सुरवात करता. तुम्हाला हे समजायला लागते की, येशू ख्रिस्त, जिवंत देव तुमच्यात आणि तुमच्याद्वारे त्याचे जीवन जगण्याचा प्रयत्न करीत आहे कशासाठी की, जे त्याचे म्हणजे देवाची मुले आहेत त्यांच्यामध्ये त्याची इच्छा त्याला पूर्ण करता येईल. तुम्ही ख्रिस्तासारखे बनत आहात, भूतकाळ सोडून त्याच्या मागे जात आहात.






स्तोत्र. ४०:३, योहान ९:२५, योहान १२:१७, कलस्सै. ४:५-६, १ थेस्सलनी. १:६-८, १ पेत्र. ३:१५, प्रकटी. १२:११, प्रकटी. १९:१०



# साक्षी कशी द्यावी

**येशू ख्रिस्ताची अविश्वासणाऱ्या व्यक्तीला ओळख करून देण्यासाठी सूचना.** वधस्तंभाचा संदेश देण्यासाठी खालील दहा सूचना एक प्रभावी माध्यम आहेत. दिशानिर्देशांचे काळजीपूर्वक अनुसरण करा आणि तुम्ही यशस्वी व्हाल. तुम्ही एक प्रभावी बियाणे पेरणारा आणि आत्मा जिंकणारे व्हाल. कोणत्याही परिस्थितीत, तुम्ही देवाचे राज्य वाढविण्यात गुंतले असाल आणि तोच आपल्या अस्तित्वाचा मुख्य हेतू आहे.

- **दहा लोकांचा विचार करा.** हे कदाचित तुमचे मित्र, नातेवाईक, प्रियजन किंवा व्यवसायातील किंवा दैनंदिन जीवनात जेथे तुम्ही खरेदीला जाता, ज्यांच्याशी खेळता आणि ज्यांच्या सोबत काम करता ते लोक असू शकतात.
- **त्यांची नावे लिहा.** जेव्हा तुम्ही ती खास दहा नावे लिहून पूर्ण करता तेव्हा तो कागदाचा तुकडा अशा ठिकाणी चिकटवा जो तुम्हाला सहज दिसेल आणि दररोज त्यांची आठवण येईल.
- **प्रत्येक व्यक्तीच्या** तारणासाठी प्रार्थना करण्यास सुरवात करा. जेव्हा तुम्ही प्रार्थना करता तेव्हा देवाला विनंती करा की, येशु आणि सार्वकालिक जीवनाबद्दल त्यांनी ऐकावे म्हणून त्यांची मने आणि अंतःकरणे उघडली जावीत. लक्षात ठेवा आपण वाईट माणसांना चांगले बनवण्याचा प्रयत्न करीत नाही, परंतु आध्यात्मिकदृष्ट्या मृत लोकांना सार्वकालिक जीवन जे तुम्हाला मिळाले आहे ते त्यांना देत आहोत.

• **प्रत्येकासाठी एकवीस दिवस प्रार्थना करा.** तुम्ही या विशिष्ट लोकांसाठी प्रार्थना करण्यात किती वेळ घालवता याकडे देव लक्ष देत नाही, परंतु आपल्याला माहित आहे की, सवय स्थापित करण्यास एकवीस दिवस लागतात. त्या कालावधीत तुम्ही त्यांच्याकरिता प्रार्थना केली आहे हे सुनिश्चित करा. मग तुम्हाला हरवलेल्यांसाठी प्रार्थना करण्याची सवय लागलेली असेल.



• **प्रत्येकाशी संपर्क साधण्यास प्रारंभ करा.** एकवीस दिवसानंतर, तुम्ही प्रार्थनेसह तुमचे विषय पूर्ण केले असणार आणि आता कृती करण्याची वेळ आली आहे. पहिल्या व्यक्तीला फोन करा आणि त्याला सांगा की तुमच्याकडे त्याला दाखवून देण्यासाठी काहीतरी आहे आणि तुम्ही पहा की, असे बोलणे अर्थपूर्ण आहे का. तुमच्या मित्राला कॉफी किंवा दुपारच्या जेवणासाठी आमंत्रित करा. तुम्हाला त्याच्याकडून 'होय' असे उत्तर येईपर्यंत त्याला फोन करत रहा किंवा त्याच्या संपर्कात रहा.

• **देवाचे मूल कसे व्हावे हे पुस्तक त्यांना दाखवा.** तुमच्या मित्राला सांगा की, तुम्ही हे लहानसे पुस्तक वाचले आणि त्याचा तुमच्यावर प्रभाव पडला आहे आणि हाच प्रभाव त्याच्यावर पडावा अशी तुमची इच्छा आहे. ही गोष्ट त्यांच्यासाठी अर्थपूर्ण ठरते का ते पहा. जर तुमच्याकडे संगणक किंवा आयपॅड किंवा इतर मोबाइल उपकरण असल्यास तुम्ही www.howtobeachildofgod.com या संकेतस्थळावर जाऊन ईबुक वाचू शकता किंवा तुमच्याकडे वास्तविक पुस्तकाची प्रत नसल्यास व्हिडिओ सादरीकरण दाखवू शकता.

• **या पुस्तकाचे प्रत्येक पान वाचून काढा.** पृष्ठ क्रमांक १४ वरील प्रार्थना वाचा पण पुस्तक पूर्ण होईपर्यंत वाचत जा. तुमच्या मित्राला पुस्तिकेच्या मागील बाजूस असलेली शास्त्रवचने दाखवा, पवित्र शास्त्र उपलब्ध नसल्यास सोप्या संदर्भासाठी ती तिथे देण्यात आली आहेत हे स्पष्ट करा. वचन कशाप्रकारे स्पष्टीकरण देते हे दाखवून द्या किंवा वचन सिद्ध करून दाखवा किंवा त्यासाठी एखादे उदाहरण द्या.

• **तुमची गोष्ट/ साक्ष सांगा.** त्याक्षणी, तुम्ही तुमची गोष्ट/ साक्ष सांगण्यास प्रारंभ करा की कशाप्रकारे तुमची येशू ख्रिस्ताशी ओळख झाली आहे. साक्ष हे स्पष्ट करते: तो अनुभव कसा होता, काय झाले, सद्यस्थिती काय आहे. जर तुमच्याकडे दुसऱ्याशी संबंध जोडू शकेल अशी साक्ष नसल्यास, तुम्ही खाजगीत पुस्तक वाचून काढले पाहिजे. पृष्ठ क्रमांक १४ वरील प्रार्थना मोठ्याने करा आणि तुम्ही तुमच्या अंत:करणात जे म्हटले आहे त्यावर विश्वास ठेवा. नंतर तुम्ही परत जाऊन संभाषण सुरू ठेवू शकता. *तुमची गोष्ट/ साक्ष कशी सांगाल हा लेख पहा: या पृष्ठांपूर्वी वैयक्तिक साक्षीद्वारे ख्रिस्ती लोक साक्ष सांगतात.*



जो ख्रिस्त तुमच्यामध्ये आहे
कलस्सै. १:२७

• **एक अग्रगण्य प्रश्न विचारा.** तुमच्या मित्राला विचारा की, तुम्ही त्याला जे काही सांगितले आहे ते त्याच्यासाठी अर्थपूर्ण आहे का. त्याला विचारा की, मरणानंतर तो स्वर्गात जाईल असे त्याला वाटते का. त्याला विचार करा की, सार्वकालीक जीवनाचा अर्थ त्याच्यासाठी काय आहे. त्याच्याशी आध्यात्मिक आणि ख्रिस्त केंद्रित संभाषणात करा. बोलण्यासाठी लागणारे शब्द देव तुम्हाला देईल तुम्हाला केवळ इच्छुक आणि मुक्त असण्याची आवश्यकता आहे.

• **तुमच्या मित्राला येशू ख्रिस्ताची ओळख करून द्या.** जर त्या व्यक्तीने सकारात्मक प्रतिक्रिया दिली तर (“तुमच्याकडे जे आहे ते मला देखील पाहिजे. तुम्ही ख्रिस्ती कसे बनला? मला अधिक जाणून घ्यायचे आहे.”) *देवाचे मुल कसे व्हावे* या पुस्तकातील पृष्ठ क्रमांक १४ वरील प्रार्थनेकडे परत जा आणि ती प्रार्थना तुमच्या मित्राला मोठ्याने म्हणून द्या किंवा तुमच्या मागे म्हणू द्या. त्याच्याबरोबर प्रार्थना केल्यानंतर, वधस्तंभाच्या संदेशाबद्दल सर्व काही समजले आहे याची खात्री करण्यासाठी १५-२० या पृष्ठांवरील मजकूरांकडे आणि चित्रांकडे परत जा. तुम्ही हे पूर्ण केल्यानंतर, गौरवात एक नवीन नाव दिले जाईल आणि तुमचा मित्र देवाचे मूल होईल!

# कापणी करा

तुम्ही या सोप्या सूचनांचे अनुसरण केल्यास तुम्ही आत्मे जिंकणारे व्हाल. कोणताही प्रश्न किंवा अट नाही. देवाने तुम्हाला तुम्ही ज्या लोकांना आधीपासूनच ओळखता त्या विशिष्ट लोकांना प्रभावित करण्याच्या रचनेसह आणि व्यक्तित्वासह भिन्न प्रकारे निर्माण केले आहे. आपल्याला फक्त प्रार्थना करण्याची आणि त्यांच्याकडे जाण्याची इच्छा आहे. **तो बाकीचे करेल!** शक्यता अशी आहे की, तुम्ही तुमच्या यादीत ज्या लोकांची नावे लिहिली आहेत अगदी त्याच लोकांना त्याने निवडले आहेत. त्यांना केवळ उद्घोषकांची आवश्यकता आहे आणि तो उद्घोषक किंवा घोषणा करणारा तुम्ही आहात! **तुम्ही तुमच्या मित्राशी बोलता तेव्हा देव तुमच्याद्वारे बोलेल. फक्त विश्वास ठेवा की संपूर्ण कृतीची रचना वेळेच्या अगोदरच करण्यात आली आहे आणि देव तुमच्या येण्याची वाट पहात आहे.** तुमच्या संधीचा फायदा घ्या आणि आपल्या पित्यास तेच पाहिजे आहे. फक्त अट अशी आहे की, त्या व्यक्तीला ख्रिस्ताकडे येण्याची वेळ अगदी योग्य असू शकत नाही. अशा परिस्थितीत, त्या दिवशी तुम्ही आत्मा जिंकणारे होणार नाही, परंतु तुम्ही बी पेरणारे व्हाल. कोणत्याही प्रकारे, तुम्ही तुमच्या स्वर्गीय पित्याचे आज्ञापालन कराल आणि खरोखरच याच गोष्टीची तो आपल्याकडून अपेक्षा करतो. जर तुम्ही देवाचे मूल आहात, तर ते कार्य तुम्ही कधीही करत नसून तुमच्यात असलेला ख्रिस्त ते कार्य करीत आहे.



मत्तय ४:१९-२०, मत्तय १०:३२, लूक ९:६०, लूक १०:२, लूक १९:१०, योहान १५:१६, प्रेषित. १:८, प्रेषित. ९:२८, १ तीमथ्य.२:३-४

## वर्णानुक्रमे पवित्र शास्त्रातील वचने

इफिस. १:११ आपल्या मनाच्या संकल्पाप्रमाणे जो अवघे चालवतो त्याच्या योजनेप्रमाणे आम्ही पूर्वी नेमलेले असून ख्रिस्ताच्या ठायी वतनदार झालो आहोत; पृष्ठ १८

इफिस. १:१३-१४ तुम्हीही सत्याचे वचन म्हणजे तुमच्या तारणाविषयीची सुवार्ता ऐकून घेतल्यानंतर त्याच्यावर विश्वास ठेवला आणि त्याने देऊ केलेल्या पवित्र आत्म्याचा तुमच्यावर त्याच्या ठायी शिक्का मारण्यात आला आहे. देवाच्या गौरवाची स्तुती व्हावी म्हणून त्याच्या स्वकीय जनाच्या, खंडणी भरून मिळवलेल्या मुक्तीसाठी हा पवित्र आत्मा आपल्या वतनाचा विसार आहे. पृष्ठे १७ व १९

इफिस. १:५-८ त्याने आपल्या मनाच्या सत्संकल्पाप्रमाणे आपल्याला येशू ख्रिस्ताच्या द्वारे स्वतःचे दत्तक होण्याकरता प्रेमाने पूर्वीच नेमले होते. त्याच्या कृपेच्या गौरवाची स्तुती व्हावी म्हणून हे झाले. ही कृपा त्याने आपल्यावर त्या प्रियकराच्या ठायी विपुलतेने केली आहे. त्याच्या कृपेच्या समृद्धीप्रमाणे त्या प्रियकराच्या ठायी, त्याच्या रक्ताच्या द्वारे खंडणी भरून मिळवलेली मुक्ती, म्हणजे आपल्या अपराधांची क्षमा, आपल्याला मिळाली आहे. सर्व ज्ञान व बुद्धी ह्यांच्यासह त्याने ही कृपा आपल्यावर विपुलतेने केली आहे. पृष्ठे १५ व १६

इफिस. १:७ त्याच्या कृपेच्या समृद्धीप्रमाणे त्या प्रियकराच्या ठायी, त्याच्या रक्ताच्या द्वारे खंडणी भरून मिळवलेली मुक्ती, म्हणजे आपल्या अपराधांची क्षमा, आपल्याला मिळाली आहे. पृष्ठ ४

इफिस. २:१३ परंतु जे तुम्ही पूर्वी 'दूर' होता ते तुम्ही आता ख्रिस्त येशूच्या ठायी ख्रिस्ताच्या रक्ताच्या योगे 'जवळचे' झाला आहात. पृष्ठ १३

इफिस. २:१४ कारण तोच आमची शांती आहे; त्याने दोघांना एक केले आणि मधली आडभिंत पाडली; पृष्ठ ९

इफिस. २:६ आणि ख्रिस्त येशूच्या ठायी त्याच्याचबरोबर उठवले व त्याच्याचबरोबर स्वर्गात बसवले; पृष्ठ १९

इफिस. २:८-१० कारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे तुमचे तारण झालेले आहे आणि हे तुमच्या हातून झाले असे नाही, तर हे देवाचे दान आहे; कोणी आढ्यता बाळगू नये म्हणून कर्मे केल्याने हे झाले नाही. आपण सत्कृत्ये करावीत म्हणून ख्रिस्त येशूच्या ठायी निर्माण केलेले असे आपण त्याची हस्तकृती आहोत; ती सत्कृत्ये आचरत आपण आपला आयुष्यक्रम चालवावा म्हणून देवाने ती पूर्वी योजून ठेवली. पृष्ठे ८ व १५ व १६

इफिस. ३:१४-१५ ह्या कारणास्तव स्वर्गातील व पृथ्वीवरील प्रत्येक वंशास ज्या पित्यावरून नाव देण्यात येते, त्या [प्रभू येशू ख्रिस्ताच्या] पित्यासमोर मी गुडघे टेकून अशी विनंती करतो की, पृष्ठ १७

इफिस. ४:२१-२२ तुम्ही तर त्याचेच ऐकले असेल व येशूच्या ठायी जे सत्य आहे त्याप्रमाणे तुम्हांला त्याच्यामध्ये शिक्षण मिळाले असेल; ते असे की, तुमच्या पूर्वीच्या आचरणासंबंधी जो जुना मनुष्य त्याचा तुम्ही त्याग करावा, तो कपटाच्या वासनांनी युक्त असून त्याचा नाश होत आहे; पृष्ठ २५

इब्री. १:३ हा त्याच्या गौरवाचे तेज व त्याच्या तत्त्वाचे प्रतिरूप असून आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने विश्वाधार आहे, आणि [स्वतः आमच्या] पापांची शुद्धी केल्यावर तो उर्ध्वलोकी राजवैभवाच्या 'उजवीकडे बसला.' पृष्ठे १ व २ व ५

इब्री. २:११-१७ कारण जो पवित्र करणारा व ज्यांना पवित्र करण्यात येत आहे ते सर्व एकापासूनच आहेत, ह्या कारणास्तव त्यांना 'बंधू' म्हणायची त्याला लाज वाटत नाही. तो म्हणतो, "मी आपल्या बंधूंजवळ तुझ्या नावाची कीर्ती वर्णीन, महामंडळात तुझे स्तवन करीन." आणि पुन्हा तो म्हणतो, "मी त्याच्यावर भरवसा ठेवीन." तसेच, "पाहा, मी व देवाने मला दिलेली मुले." ज्या अर्थी 'मुले' एकाच रक्तमांसाची होती त्या अर्थी तोही त्यांच्यासारखा रक्तमांसाचा झाला, हेतू हा की, मरणावर सत्ता गाजवणारा म्हणजे सैतान, ह्याला मरणाने शून्यवत करावे, आणि जे मरणाच्या भयाने आयुष्यभर दास्याच्या बंधनात होते त्या सर्वांना मुक्त करावे. कारण, खरे पाहता तो देवदूतांच्या साहाय्यास नव्हे, तर 'अब्राहामाच्या संतानाच्या साहाय्यास येतो.' म्हणून त्याला सर्व प्रकारे 'आपल्या बंधूंसारखे' होणे अगत्याचे होते, ह्यासाठी की, लोकांच्या पापांबद्दल प्रायश्चित्त करण्याकरता त्याने स्वत: देवासंबंधीच्या गोष्टींविषयी दयाळू व विश्वसनीय प्रमुख याजक व्हावे. पृष्ठे १ व २ व २०

इब्री. २:१४-१५ ज्या अर्थी 'मुले' एकाच रक्तमांसाची होती त्या अर्थी तोही त्यांच्यासारखा रक्तमांसाचा झाला, हेतू हा की, मरणावर सत्ता गाजवणारा म्हणजे सैतान, ह्याला मरणाने शून्यवत करावे, आणि जे मरणाच्या भयाने आयुष्यभर दास्याच्या बंधनात होते त्या सर्वांना मुक्त करावे. पृष्ठ ४

इब्री. ४:१२ कारण देवाचे वचन सजीव, सक्रिय, कोणत्याही दुधारी तलवारीपेक्षा तीक्ष्ण असून, जीव व आत्मा, सांधे व मज्जा ह्यांना भेदून आरपार जाणारे आणि मनातील विचार व हेतू ह्यांचे परीक्षक असे आहे. पृष्ठ २४ व २६

इब्री. ४:३ त्याची 'कृत्ये' जगाच्या स्थापनेपासून समाप्त झाली. तथापि, "त्याप्रमाणे मी रागाने शपथ वाहून म्हणालो, 'हे माझ्या विसाव्यात निश्चित येणार नाहीत;'" असे ज्या 'विसाव्याविषयी,' त्याने सांगितलेले आहे त्यात, ज्या आपण विश्वास ठेवला आहे ते 'आपण प्रवेश करत आहोत.' पृष्ठ १३

इब्री. ४:७ म्हणून तो पुन्हा 'आज' हा एक दिवस ठरवतो आणि अगोदर सांगितल्याप्रमाणे इतक्या काळानंतर तो दाविदाच्या द्वारे म्हणतो की, "आज जर तुम्ही त्याची वाणी ऐकाल, तर आपली मने कठीण करू नका." पृष्ठ १३

इब्री. ९:२२ नियमशास्त्राप्रमाणे रक्ताने बहुतेक सर्वकाही शुद्ध होते, आणि रक्त ओतल्यावाचून पापक्षमा होत नाही. पृष्ठ ४

उत्पत्ती २:१६-१७ व्हा परमेश्वर देवाने आदामाला अशी आज्ञा दिली की, "बागेतील वाटेल त्या झाडाचे फळ यथेच्छ खा; पण बऱ्यावाइटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नको; कारण ज्या दिवशी त्याचे फळ तू खाशील त्या दिवशी तू खास मरशील." पृष्ठ ६

उत्पत्ती २:७ मग परमेश्वर देवाने जमिनीतील मातीचा मनुष्य घडवला व त्याच्या नाकपुड्यांत जीवनाचा श्वास फुंकला; तेव्हा मनुष्य जीवधारी प्राणी झाला. पृष्ठ २४

उत्पत्ती २:८-९ परमेश्वर देवाने पूर्वेला एदेनात बाग लावली आणि तिच्यात आपण घडवलेल्या मनुष्याला ठेवले. परमेश्वर देवाने दिसण्यात सुंदर व अन्नासाठी उपयोगी अशी सर्व जातींची झाडे, बागेच्या मध्यभागी जीवनाचे झाड, आणि बऱ्यावाइटाचे ज्ञान करून देणारे झाड ही जमिनीतून उगववली. पृष्ठ ६

उत्पत्ती ३:२-६ स्त्रीने सर्पाला म्हटले, "बागेतल्या झाडांची फळे खाण्याची आम्हांला मोकळीक आहे: पण बागेच्या मध्यभागी असलेल्या झाडाच्या फळाविषयी देवाने सांगितले आहे की ते खाऊ नका; त्याला स्पर्शही करू नका, कराल तर मराल." सर्प स्त्रीला म्हणाला, "तुम्ही खरोखर मरणार नाही; कारण देवाला हे ठाऊक आहे की तुम्ही त्याचे फळ खाल त्याच दिवशी तुमचे डोळे उघडतील. आणि तुम्ही देवासारखे बरेवाईट जाणणारे व्हाल." त्या झाडाचे फळ खायला चांगले, दिसायला मनोहर आणि शहाणे करायला इष्ट आहे असे त्या स्त्रीला दिसून आले; तेव्हा तिने त्याचे फळ काढून खाल्ले, आणि आपल्याबरोबर आपल्या पतीलाही ते दिले व त्याने ते खाल्ले. पृष्ठ ६

उत्पत्ती ३:२३ ह्यास्तव ज्या जमिनीतून त्याला उत्पन्न केले होते, तिची मशागत करावी म्हणून परमेश्वर देवाने त्याला एदेन बागेतून बाहेर काढून लावले. पृष्ठ ६

उपदेशक ३:११ आपापल्या समयी होणारी हरएक वस्तू त्याने सुंदर बनवली आहे; त्याने मनुष्याच्या मनात अनंतकालाविषयीची कल्पना उत्पन्न केली आहे; तरी देवाचा आदिपासून अंतापर्यंतचा कार्यक्रम मनुष्याला उमगत नाही. पृष्ठ १०

कलस्सै. १:१५ तो अदृश्य देवाचे प्रतिरूप आहे; तो सर्व उत्पत्तीत ज्येष्ठ आहे; पृष्ठ १ व २

कलस्सै. १:२७ब गौरवाची आशा असा जो ख्रिस्त तुमच्यामध्ये आहे तो ते रहस्य आहे. पृष्ठ २५

कलस्सै. २:१२-१४ तुमचा बाप्तिस्मा झाला तेव्हा तुम्ही त्याच्याबरोबर पुरले गेलात, आणि ज्याने त्याला मेलेल्यांतून उठवले त्या देवाच्या कृतीवरील विश्वासाच्या द्वारे त्याच्याबरोबर उठवलेही गेलात. जे तुम्ही आपल्या अपराधांनी व देहस्वभावाची सुंता न झाल्याने मेलेले होता त्या तुम्हांला त्याने त्याच्याबरोबर जिवंत केले, त्याने आपल्या सर्व अपराधांची क्षमा केली;आपल्या विरुद्ध असलेले म्हणजे आपल्याला प्रतिकूल असलेले विधींचे ऋणपत्र त्याने खोडले व वधस्तंभाला खिळून त्याने ते रद्द केले. पृष्ठ १९

कलस्सै. २:६-७ तर ख्रिस्त येशू जो प्रभू, ह्याला जसे तुम्ही स्वीकारले तसे त्याच्यामध्ये चालत राहा; त्याच्यामध्ये मुळावलेले, रचले जात असलेले, तुम्हांला शिकवल्याप्रमाणे विश्वासात दृढ होत असलेले, आणि निरंतर उपकारस्तुती करणारे व्हा. पृष्ठे १५ व १६

कलस्सै. २:९ कारण ख्रिस्ताच्या ठायीच देवपणाची सर्व पूर्णता मूर्तिमान वसते, पृष्ठे १ व २

कलस्सै. ३:१-३ म्हणून तुम्ही ख्रिस्ताबरोबर उठवले गेला आहात, तर ख्रिस्त देवाच्या उजवीकडे जेथे बसला आहे, तेथल्या वरील गोष्टी मिळवण्याचा यत्न करा. वरील गोष्टींकडे मन लावा. पृथ्वीवरील गोष्टींकडे लावू नका. कारण तुम्ही मृत झाला आहात आणि तुमचे जीवन ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवलेले आहे. पृष्ठ १९

कलस्सै. ४:५-६ बाहेरच्या लोकांबरोबर सुज्ञतेने वागा; संधी साधून घ्या. तुमचे बोलणे सर्वदा कृपायुक्त, मिठाने रूचकर केल्यासारखे असावे, म्हणजे प्रत्येकाला कसaकसे उत्तर द्यायचे हे तुम्ही समजावे. पृष्ठ ३६

गलती. १:१५-१६ तरी ज्या देवाने मला माझ्या मातेच्या उदरातून जन्मल्यापासून वेगळे केले व आपल्या कृपेने बोलावले, त्याला आपल्या पुत्राला माझ्या ठायी प्रकट करणे बरे वाटले, अशासाठी की, मी परराष्ट्रीयांमध्ये त्याच्या सुवार्तेची घोषणा करावी; पृष्ठ ८

गलती. २:२० मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे; आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो; आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे; त्याने माझ्यावर प्रीती केली व स्वत:ला माझ्याकरता दिले. पृष्ठ १८

गलती. ४:४-७ परंतु काळाची पूर्णता झाली, तेव्हा देवाने आपल्या पुत्राला पाठवले; तो स्त्रीपासून जन्मलेला, नियमशास्त्राधीन जन्मलेला असा होता. ह्यात उद्देश हा होता की, जे नियमशास्त्राधीन होते त्यांना त्याने खंडणी भरून सोडवावे, आणि आपल्याला पुत्राचा हक्क मिळावा. तुम्ही पुत्र आहात, म्हणून देवाने "अब्बा! बापा!" अशी हाक मारणाऱ्या आपल्या पुत्राच्या आत्म्याला तुमच्याआमच्या अंतःकरणांत पाठवले आहे. म्हणून तू आतापासून गुलाम नाहीस तर पुत्र आहेस; आणि पुत्र आहेस तर ख्रिस्ताच्या द्वारे देवाचा वारसही आहेस. पृष्ठ १८

गलती. ५:१६ मी तर म्हणतो, आत्म्याच्या प्रेरणेने चाला, म्हणजे तुम्ही देहवासना पूर्ण करणारच नाही. पृष्ठ २३

गलती. ५:२४ जे ख्रिस्त येशूचे आहेत त्यांनी विकार व वासना ह्यांच्यासह देहस्वभाव वधस्तंभावर खिळला आहे. पृष्ठे १७ व १८

नीति. १४:१२ मनुष्याला एक सरळ मार्ग दिसतो, पण त्याच्या शेवटास मृत्युपथ फुटतात. पृष्ठ ११

प्रकटी. १२:११ त्याला त्यांनी कोकऱ्याच्या रक्तामुळे व आपल्या साक्षीच्या वचनामुळे जिंकिले; आणि त्यांच्यावर मरायची पाळी आली तरी त्यांनी आपल्या जिवावर प्रीती केली नाही. पृष्ठ ३६

प्रकटी. १९:१० तेव्हा मी त्याच्या पाया पडून नमन करणार होतो; परंतु तो मला म्हणाला, "असे करू नये; मी तुझ्या सोबतीचा आणि जे येशूविषयीची साक्ष देतात त्या तुझ्या बंधूंच्या सोबतीचा दास आहे. नमन देवाला कर;" कारण येशूविषयीची साक्ष हे संदेशाचे मर्म आहे. पृष्ठ ३६

प्रकटी. २१:२ तेव्हा मी 'पवित्र नगरी, नवी यरुशलेम', देवापासून स्वर्गातून उतरताना पाहिली. ती नवऱ्यासाठी 'शृंगारलेल्या नवरीप्रमाणे' सजवलेली होती. पृष्ठ २०

प्रकटी. ३:२० पाहा, मी दाराशी उभा आहे व दार ठोकत आहे; जर कोणी माझी वाणी ऐकून दार उघडील, तर मी त्याच्याजवळ आत जाईन व त्याच्याबरोबर जेवीन, आणि तो माझ्याबरोबर जेवील. पृष्ठ ९

प्रेषित. १:८ परंतु पवित्र आत्मा तुमच्यावर येईल तेव्हा तुम्हांला सामर्थ्य प्राप्त होईल, आणि यरुशलेमेत, सर्व यहूदीयात, शोमरोनात व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल." पृष्ठ ४०

प्रेषित. ४:१२ आणि तारण दुसऱ्या कोणाकडून नाही; कारण जेणेकरून आपले तारण होईल असे दुसरे कोणतेही नाव आकाशाखाली मनुष्यांमध्ये दिलेले नाही." पृष्ठ ८

प्रेषित. ९:२८ तो यरुशलेमेत प्रभू येशूच्या नावाने धैर्याने बोलत त्यांच्याबरोबर जात येत असे; पृष्ठ ४०

फिलिप्पै. २:५-८ अशी जी चित्तवृत्ती ख्रिस्त येशूच्या ठायी होती ती तुमच्या ठायीही असो; तो देवाच्या स्वरूपाचा असूनही देवाच्या बरोबरीचे असणे हा लाभ आहे असे त्याने मानले नाही, तर त्याने स्वतःला रिक्त केले, म्हणजे मनुष्याच्या प्रतिरूपाचे होऊन दासाचे स्वरूप धारण केले. आणि मनुष्यप्रकृतीचे असे प्रकट होऊन त्याने मरण, आणि तेही वधस्तंभावरचे मरण सोसले; येथपर्यंत आज्ञापालन करून त्याने स्वतःला लीन केले. पृष्ठे १, २, २२ व २५

फिलिप्पै. ३:२० आपले नागरिकत्व तर स्वर्गात आहे; तेथून प्रभू येशू ख्रिस्त हा तारणारा येणार आहे, त्याची आपण वाट पाहत आहोत; पृष्ठे २०, २२ व २३

फिलिप्पै. ४:६-७ कशाविषयीही चिंताक्रांत होऊ नका, तर सर्व गोष्टींविषयी प्रार्थना व विनंती करून आभारप्रदर्शनासह आपली मागणी देवाला कळवा. म्हणजे सर्व बुद्धिसामर्थ्याच्या पलीकडे असलेली देवाने दिलेली शांती तुमची अंतःकरणे व तुमचे विचार ख्रिस्त येशूच्या ठायी राखील. पृष्ठ २६

मत्तय १:२०ब -२३ "कारण तिच्या पोटी जो गर्भ आहे तो पवित्र आत्म्यापासून आहे. तिला पुत्र होईल, आणि त्याचे नाव तू येशू असे ठेव, कारण तोच आपल्या प्रजेला त्यांच्या पापांपासून तारील." हे सर्व अशासाठी झाले की, प्रभूने संदेष्ट्याच्या द्वारे जे सांगितले ते पूर्ण व्हावे; ते असे : "पाहा, कुमारी गर्भवती होईल व तिला पुत्र होईल आणि त्याला इम्मानुएल हे नाव देतील." ह्या नावाचा अर्थ, 'आमच्याबरोबर देव.' पृष्ठ १

मत्तय १०:३२ जो कोणी माणसांसमोर मला पत्करील त्याला मीही आपल्या स्वर्गातील पित्यासमोर पत्करीन; पृष्ठ ४०

मत्तय २६:२८-२९ मग ते भोजन करत असताना येशूने भाकर घेतली व आशीर्वाद देऊन ती मोडली आणि शिष्यांना देऊन म्हटले, "घ्या, खा, हे माझे शरीर आहे." पृष्ठ ४

मत्तय २७:५७-६१ मग संध्याकाळ झाल्यावर अरिमथाईतील योसेफ नावाचा एक धनवान मनुष्य आला, हाही येशूचा शिष्य होता. त्याने पिलाताकडे जाऊन येशूचे शरीर मागितले. तेव्हा पिलाताने ते देण्याची आज्ञा केली. योसेफाने ते शरीर घेऊन तागाच्या स्वच्छ वस्त्रात गुंडाळले; ते त्याने खडकात खोदलेल्या आपल्या नव्या कबरेत ठेवले, एक मोठी धोंड लोटून ती कबरेच्या दाराला लावली आणि तो निघून गेला. पण तेथे कबरेसमोर मग्दालीया मरीया व दुसरी मरीया ह्या बसल्या होत्या. पृष्ठ ४

मत्तय ३:१३-१७ तेव्हा योहानाच्या हातून बाप्तिस्मा घेण्याकरता येशू गालीलाहून यार्देनेवर त्याच्याकडे आला. परंतु योहान त्याला मना करत म्हणाला, "आपल्या हातून मी बाप्तिस्मा घ्यावा, असे असता आपण माझ्याकडे येता हे काय?" येशूने त्याला उत्तर दिले, "आता हे होऊ दे; कारण ह्या प्रकारे सर्व धर्माचरण पूर्णपणे करणे हे आपणांला उचित आहे." तेव्हा त्याने तसे होऊ दिले. मग बाप्तिस्मा घेतल्यावर येशू लगेच पाण्यातून वर आला आणि पाहा, आकाश उघडले, तेव्हा त्याने परमेश्वराचा आत्मा कबुतरासारखा उतरताना व आपणावर येताना पाहिला, आणि पाहा, आकाशातून अशी वाणी झाली की, "हा माझा 'पुत्र', मला 'परमप्रिय आहे, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे."' पृष्ठे ३ व २६

मत्तय ४:१९-२० त्याने त्यांना म्हटले, "माझ्यामागे या म्हणजे मी तुम्हांला माणसे धरणारे करीन." लगेच ते जाळी सोडून देऊन त्याला अनुसरले. पृष्ठ ४०

मत्तय ७:१३-१४ अरुंद दरवाजाने आत जा; कारण नाशाकडे जाण्याचा दरवाजा रुंद व मार्ग पसरट आहे आणि त्यातून आत जाणारे पुष्कळ आहेत; परंतु जीवनाकडे जाण्याचा दरवाजा अरुंद व मार्ग संकुचित आहे आणि ज्यांना तो सापडतो ते थोडके आहेत. पृष्ठ २३

मत्तय ७:२८-२९ येशूने हे सर्व बोलणे समाप्त केल्यावर असे झाले की, लोकसमुदाय त्याच्या शिक्षणावरून थक्क झाले; कारण तो त्यांना त्यांच्या शास्त्री लोकांसारखा नव्हे तर अधिकारवाणीने शिकवत होता. पृष्ठ ३

मत्तय ७:७-८ मागा म्हणजे तुम्हांला दिले जाईल, शोधा म्हणजे तुम्हांला सापडेल, ठोका म्हणजे तुमच्यासाठी उघडले जाईल. कारण जो कोणी मागतो त्याला मिळते, जो शोधतो त्याला सापडते व जो ठोकतो त्याच्यासाठी उघडले जाईल. पृष्ठ २६

मार्क ६:२-३ मग शब्बाथ दिवशी तो सभास्थानात शिकवू लागला आणि पुष्कळ लोक त्याचे भाषण ऐकून थक्क झाले व म्हणाले, “ह्याला हे सर्व कोठून प्राप्त झाले? काय हे ज्ञान ह्याला देण्यात आले आहे आणि ह्याच्या हातून केवढी ही महत्कृत्ये होतात! जो सुतार, जो मरीयेचा मुलगा आणि याकोब, योसे, यहूदा व शिमोन ह्यांचा जो भाऊ तोच हा आहे ना? आणि ह्याच्या बहिणी येथे आपल्याबरोबर आहेत ना?” असे ते त्याच्याविषयी अडखळले. पृष्ठ ३

यहेज्केल. ३६:२६-२७ मी तुम्हांला नवे हृदय देईन, तुमच्या ठायी नवा आत्मा घालीन; तुमच्या देहातून पाषाणमय हृदय काढून टाकीन व तुम्हांला मांसमय हृदय देईन. मी तुमच्या ठायी माझा आत्मा घालीन आणि तुम्ही माझ्या नियमांनी चालाल, माझे निर्णय पाळून त्यांप्रमाणे आचरण कराल असे मी करीन. पृष्ठ ८

यहोशवा १:८ नियमशास्त्राचा हा ग्रंथ तुझ्या मुखी सदैव असू दे; त्यात जे काही लिहिले आहे ते तू काळजीपूर्वक पाळ आणि रात्रंदिवस त्याचे मनन कर, म्हणजे तुझा मार्ग सुखाचा होईल व तुला यश:प्राप्ती घडेल. पृष्ठ २६

याकोब. ५:१६ तेव्हा तुम्ही निरोगी व्हावे म्हणून आपली पातके एकमेकांजवळ कबूल करून एकमेकांसाठी प्रार्थना करा. नीतिमानाची प्रार्थना कार्य करण्यात फार प्रबळ असते. पृष्ठ २६

योहान १:१४ शब्द देही झाला व त्याने आमच्यामध्ये वस्ती केली, आणि आम्ही त्याचा गौरव पाहिला. तो पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचा गौरव असावा असा अनुग्रह व सत्य ह्यांनी परिपूर्ण होता. पृष्ठे १ व २

योहान १०:१० चोर येतो तो केवळ चोरी, घात व नाश करायला येतो; मी तर त्यांना जीवनप्राप्ती व्हावी व ती विपुलपणे व्हावी म्हणून आलो आहे. पृष्ठ ९

योहान १०:३० मी आणि पिता एक आहोत. पृष्ठे १ व २

योहान ११:२५-२६ येशूने तिला म्हटले, “पुनरुत्थान व जीवन मीच आहे; जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो मेला असला तरी जगेल; आणि जिवंत असलेला प्रत्येक जण जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो कधीही मरणार नाही, हे तू खरे मानतेस काय?” पृष्ठे १५ व १६ व १९

योहान १२:१७ त्याने लाजराला कबरेतून बोलावून मेलेल्यांतून उठवले, त्या वेळेस जो लोकसमुदाय त्याच्याबरोबर होता त्याने त्याबद्दल साक्ष दिली. पृष्ठ ३६

योहान १४:१३-१४ पुत्राच्या ठायी पित्याचा गौरव व्हावा म्हणून तुम्ही जे काही माझ्या नावाने मागाल ते मी करीन. तुम्ही माझ्या नावाने माझ्याजवळ काही मागाल तर मी ते करीन. पृष्ठ २६

योहान १४:२० त्या दिवशी तुम्हांला समजेल की, मी आपल्या पित्यामध्ये आहे, व तुम्ही माझ्यामध्ये व मी तुमच्यामध्ये आहे. पृष्ठे १८ व १९

योहान १४:६-७ येशूने त्याला म्हटले, “मार्ग, सत्य व जीवन मीच आहे; माझ्या द्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणी येत नाही. मी कोण आहे हे तुम्ही ओळखले असते तर माझ्या पित्यालाही ओळखले असते; आतापासून तुम्ही त्याला ओळखता व तुम्ही त्याला पाहिलेही आहे.” पृष्ठे १३ व १५ व १६

योहान १५:१६ तुम्ही मला निवडले नाही, तर मी तुम्हांला निवडले व तुम्हांला नेमले आहे; ह्यात हेतू हा की, तुम्ही जाऊन फळ द्यावे, तुमचे फळ टिकावे आणि जे काही तुम्ही माझ्या नावाने पित्याजवळ मागाल ते त्याने तुम्हांला द्यावे. पृष्ठ ४०

योहान १५:७ तुम्ही माझ्यामध्ये राहिलात व माझी वचने तुमच्यामध्ये राहिली तर जे काही तुम्हांला पाहिजे असेल ते मागा म्हणजे ते तुम्हांला प्राप्त होईल. पृष्ठ २६

योहान १६:२८ मी पित्यापासून निघून जगात आलो आहे; पुन्हा जग सोडून मी पित्याकडे जात आहे.” पृष्ठ ५

योहान १६:३३ माझ्या ठायी तुम्हांला शांती मिळावी म्हणून मी तुम्हांला ह्या गोष्टी सांगितल्या आहेत. जगात तुम्हांला क्लेश होतील, तरी धीर धरा; मी जगाला जिंकले आहे.” पृष्ठ १०

योहान ३:१६ देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. पृष्ठ १२

योहान ३:६ देहापासून जन्मलेले देह आहेत आणि आत्म्यापासून जन्मलेले आत्मा आहेत. पृष्ठे १९ व २४

योहान ९:२५ ह्यावरून त्याने उत्तर दिले, “तो पापी आहे किंवा नाही हे मला ठाऊक नाही, पण मला एक गोष्ट

ठाऊक आहे की, मी पूर्वी आंधळा होतो व आता मला दिसते.” पृष्ठ ३६

रोम. १०:१३ कारण “जो कोणी प्रभूचे नाव घेऊन त्याचा धावा करील त्याचे तारण होईल.” पृष्ठे १५ व १६

रोम. १०:९ येशू प्रभू आहे असे जर ‘तू आपल्या मुखाने’ कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठवले असा ‘आपल्या अंत:करणात’ विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल. पृष्ठे १५ व १६

रोम. १२:१ म्हणून बंधुजनहो, मी देवाच्या करुणांमुळे तुम्हांला विनवतो की, तुम्ही आपली शरीरे जिवंत, पवित्र व देवाला ग्रहणीय यज्ञ म्हणून समर्पण करावीत; ही तुमची आध्यात्मिक सेवा आहे. पृष्ठ २५

रोम. १२:४-५ कारण जसे आपल्याला एक शरीर असून त्यात पुष्कळ अवयव आहेत, तरी त्या सर्व अवयवांचे कार्य एकच नाही, तसे आपण पुष्कळ जण असून ख्रिस्तामध्ये एक शरीर आणि प्रत्येक जण एकमेकांचे अवयव असे आहोत. पृष्ठ २५

रोम. ३:२३ कारण सर्वांनी पाप केले आहे आणि ते देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत; पृष्ठे ७ व ११

रोम. ५:१-२ ह्यास्तव आपण विश्वासाने नीतिमान ठरवलेले आहोत म्हणून आपल्याला आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या द्वारे देवाबरोबर शांती आहे. आपण ज्या कृपेमध्ये आहोत, तिच्यात आपला प्रवेशही त्याच्या द्वारे विश्वासाने झाला आहे; आणि आपण देवाच्या गौरवाच्या आशेचा अभिमान बाळगतो. पृष्ठे १० व १२

रोम. ५:११ इतकेच केवळ नाही, तर ज्याच्या द्वारे समेट ही देणगी आपल्याला आता मिळाली आहे त्या आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या द्वारे आपण देवाच्या ठायी अभिमान बाळगतो. पृष्ठ २०

रोम. ५:१२ एका माणसाच्या द्वारे पाप जगात शिरले आणि पापाच्या द्वारे मरण शिरले; आणि सर्वांनी पाप केल्यामुळे सर्व माणसांमध्ये अशा प्रकारे मरण पसरले. पृष्ठ ७

रोम. ५:१८-१९ तर मग जसे एकाच अपराधामुळे सर्व माणसांना दंडाज्ञा होते, तसे नीतिमत्त्वाच्या एकाच निर्णयाने सर्व माणसांना जीवनदायी नीतिमत्त्व प्राप्त होते. कारण जसे त्या एकाच मनुष्याच्या आज्ञाभंगाने पुष्कळ जण पापी ठरले होते, तसे ह्या एकाच मनुष्याच्या आज्ञापालनाने पुष्कळ जण नीतिमान ठरतील. पृष्ठे ७ व १७

रोम. ५:५ आणि ‘आशा लाजवत नाही;’ कारण आपल्याला दिलेल्या पवित्र आत्म्याच्या द्वारे आपल्या अंतःकरणात देवाच्या प्रीतीचा वर्षाव झाला आहे. पृष्ठ १९

रोम. ५:६ आपण दुर्बळ असतानाच ख्रिस्त सुवेळी अभक्तांसाठी मरण पावला. पृष्ठ ४

रोम. ५:९ तर आता त्याच्या रक्ताने नीतिमान ठरवण्यात आल्यामुळे आपण विशेषेकरून त्याच्या द्वारे देवाच्या क्रोधापासून तारले जाणार आहोत. पृष्ठ ८

रोम. ६:११-१३ तसे तुम्हीही ख्रिस्त येशू आपला प्रभू ह्याच्याद्वारे स्वत:स पापाला मेलेले खरे, पण देवाप्रीत्यर्थ जिवंत झालेले, असे माना. ह्यास्तव तुम्ही आपल्या शरीरवासनांच्या अधीन न व्हावे म्हणून पापाने तुमच्या मर्त्य शरीरात राज्य करू नये; आणि तुम्ही आपले अवयव अनीतीची साधने होण्याकरता पापाला समर्पण करत राहू नका; तर मेलेल्यांतून जिवंत झालेले असे स्वतःस देवाला समर्पण करा आणि आपले अवयव नीतीची साधने होण्याकरता देवाला समर्पण करा. पृष्ठ २५

रोम. ६:१६ आज्ञापालनाकरता ज्याला तुम्ही स्वतःस गुलाम असे समर्पण करता, ज्याची आज्ञा तुम्ही मानता त्याचे तुम्ही गुलाम आहात. ज्याचा परिणाम मरण आहे अशा पापाचे गुलाम किंवा ज्याचा परिणाम नीतिमत्त्व आहे अशा आज्ञापालनाचे तुम्ही गुलाम आहात, हे तुम्हांला ठाऊक नाही काय? पृष्ठे ९ व २३

रोम. ६:२१ तर ज्या गोष्टींची तुम्हांला आता लाज वाटते त्यांपासून तुम्हांला त्या वेळेस काय फळ प्राप्त होत असे? त्यांचा शेवट तर मरण आहे. पृष्ठ ९

रोम. ६:२३ कारण पापाचे वेतन मरण आहे; पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे. पृष्ठ ११

रोम. ६:४-६ तर मग आपण त्या मरणातील बाप्तिस्म्याने त्याच्याबरोबर पुरले गेलो; ह्यासाठी की, ज्याप्रमाणे ख्रिस्त पित्याच्या गौरवाने मेलेल्यांतून उठला त्याचप्रमाणे आपणही नवीन प्रकारच्या जीवनात चालावे. कारण जर आपण त्याच्या मरणाच्या प्रतिरूपाने त्याच्याशी संयुक्त झालो आहोत, तर त्याच्या उठण्याच्याही प्रतिरूपाने त्याच्याशी संयुक्त होऊ. हे आपल्याला ठाऊक आहे की, हे पापाच्या अधीन असलेले शरीर नष्ट होऊन आपण ह्यापुढे पापाचे दास्य करू नये, म्हणून आपल्यातील जुना मनुष्य त्याच्याबरोबर वधस्तंभावर खिळला गेला. पृष्ठे १८ व १९

रोम. ७:१४-२५ कारण आपल्याला ठाऊक आहे की, नियमशास्त्र आध्यात्मिक स्वरूपाचे आहे; मी तर दैहिक, पापाला विकलेला असा आहे. कारण मी काय करतो ते माझे मलाच कळत नाही; म्हणजे जे मी इच्छितो ते करतो असे नाही, तर जे मला द्वेष्य वाटते तेच करतो. जे मी इच्छीत नाही ते जर मी करतो तर नियमशास्त्र उत्तम आहे अशी मी संमती देतो. तर आता ह्यापुढे ते कर्म मीच करतो असे नव्हे, तर माझ्या ठायी वसणारे पाप ते करते. कारण मला ठाऊक आहे की, माझ्या ठायी म्हणजे माझ्या देहस्वभावात काही चांगले वसत

नाही; कारण इच्छा करणे हे मला साधते, पण चांगले ते कृतीत आणणे मला साधत नाही. कारण जे चांगले करावेसे मला वाटते ते मी करत नाही; तर करावेसे वाटत नाही असे जे वाईट ते मी करतो. जे करावेसे वाटत नाही ते जर मी करतो, तर ते कर्म मी करतो असे नव्हे, तर माझ्या ठायी वसणारे पाप ते करते. तर मग जो मी सत्कर्म करू इच्छितो त्या माझ्याजवळ वाईट आहेच असा नियम मला आढळतो. माझा अंतरात्मा देवाच्या नियमशास्त्रामुळे हर्ष करतो; तरी माझ्या अवयवांत मला निराळाच नियम दिसतो; तो माझ्या मनातल्या नियमाबरोबर लढतो आणि मला कैद करून माझ्या अवयवांतील पापाच्या नियमाच्या स्वाधीन करतो. किती मी कष्टी माणूस! मला ह्या मरणाधीन असलेल्या देहापासून कोण सोडवील? आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या द्वारे मी देवाचे आभार मानतो. तर मग मी स्वतः मनाने देवाच्या नियमाचे दास्य करतो, पण देहाने पापाच्या नियमाचे दास्य करतो. पृष्ठ २३

रोम. ८:१-२ म्हणून ख्रिस्त येशूमध्ये असलेल्यांना दंडाज्ञा नाहीच. [ते देहाप्रमाणे नाही तर आत्म्याप्रमाणे चालतात.] कारण ख्रिस्त येशूमधील जीवनाच्या आत्म्याचा जो नियम, त्याने तुला पाप व मरण ह्यांच्या नियमापासून मुक्त केले आहे. पृष्ठे १७ व २३

रोम. ८:१० पण ख्रिस्त तुमच्यामध्ये असेल तर शरीर जरी पापामुळे मेलेले आहे, तरी आत्मा नीतिमत्त्वामुळे जिवंत आहे. पृष्ठे १९ व २४ व २५

रोम. ८:१५-१७अ कारण पुन्हा भीती बाळगावी असा दासपणाचा आत्मा तुम्हांला मिळाला नाही; तर ज्याच्या योगे आपण "अब्बा! बापा!" अशी हाक मारतो असा दत्तकपणाचा आत्मा तुम्हांला मिळाला आहे. तो आत्मा स्वत: आपल्या आत्म्याबरोबर साक्ष देतो की, आपण देवाची मुले आहोत; आणि जर मुले आहोत तर वारसही आहोत, म्हणजे देवाचे वारस, ख्रिस्ताबरोबर सोबतीचे वारस असे आहोत; आपल्याला त्याच्याबरोबर गौरव प्राप्त व्हावा म्हणून त्याच्याबरोबर जर दु:ख भोगत असलो तरच. पृष्ठे २० व २१

रोम. ८:३ कारण नियमशास्त्र देहस्वभावामुळे दुर्बळ झाल्याकारणाने जे त्याला असाध्य ते साधण्याकरता देवाने आपल्या स्वतःच्या पुत्राला पापमय देहासारख्या देहाने व पापाबद्दल पाठवून देहामध्ये पापाला दंडाज्ञा ठरवली; पृष्ठे १ व २ व ४

रोम. ८:३७ उलटपक्षी, ज्याने आपल्यावर प्रीती केली त्याच्या योगे ह्या सर्व गोष्टींत आपण महाविजयी ठरतो. पृष्ठ ९

रोम. ८:५-६ कारण जे देहस्वभावाचे आहेत ते दैहिक गोष्टींकडे चित्त लावतात; आणि जे आध्यात्मिक मार्गानुसारी आहेत ते आध्यात्मिक गोष्टींकडे चित्त लावतात. कारण देहस्वभावाचे चिंतन हे मरण; पण आत्म्याचे चिंतन हे जीवन व शांती आहे. पृष्ठे १७ व २३

लूक १:७८-७९ आपल्या देवाच्या परम दयेने हे झाले आहे; तिच्या योगे उदयप्रकाश वरून आमच्याकडे येईल. 'ह्यासाठी की, त्याने अंधारात व मृत्युच्छायेत बसलेल्यांना प्रकाश द्यावा,' आणि आमचे पाय शांतीच्या मार्गी लावावेत." पृष्ठ १०

लूक १०:२ तेव्हा त्याने त्यांना म्हटले, "पीक फार आहे परंतु कामकरी थोडे आहेत; ह्यास्तव पिकाच्या धन्याने आपल्या पिकासाठी कामकरी पाठवावेत म्हणून त्याची प्रार्थना करा. पृष्ठ ४०

लूक १९:१० कारण मनुष्याचा पुत्र 'हरवलेले शोधण्यास व तारण्यास आला आहे."' पृष्ठ ४०

लूक २:४० तो बालक वाढत वाढत आत्म्यात बलवान होत गेला व ज्ञानाने पूर्ण होत गेला; आणि त्याच्यावर देवाची कृपा होती. पृष्ठ ३

लूक २:४१-४७ त्याचे आईबाप दरवर्षी वल्हांडण सणास यरुशलेमेस जात असत. आणि तो बारा वर्षांचा झाला तेव्हा ते त्या सणातील रिवाजाप्रमाणे तेथे गेले. मग सणाचे दिवस संपल्यावर ते परत जाण्यास निघाले, तेव्हा तो मुलगा येशू यरुशलेमेत मागे राहिला हे त्याच्या आईबापांना कळले नाही. तो वाटेच्या सोबत्यांत असेल असे समजून ते एक दिवसाची वाट चालून गेले; नंतर नातलग व ओळखीचे ह्यांच्यामध्ये त्यांनी त्याचा शोध केला. परंतु तो त्यांना सापडला नाही, म्हणून ते त्याचा शोध करत-करत यरुशलेमेस परत गेले. मग असे झाले की, तीन दिवसांनंतर तो त्यांना मंदिरात गुरुजनांमध्ये बसून त्यांचे भाषण ऐकताना व त्यांना प्रश्न करताना सापडला. त्याचे बोलणे जे ऐकत होते, ते सर्व त्याच्या बुद्धीवरून व उत्तरांवरून थक्क झाले. पृष्ठ ३

लूक २:५२ येशू ज्ञानाने, शरीराने आणि देवाच्या व माणसांच्या कृपेत वाढत गेला." पृष्ठ ३

लूक २४:१-७ मग आठवड्याच्या पहिल्या दिवशी मोठ्या पहाटेस, आपण तयार केलेली सुगंधी द्रव्ये घेऊन त्या कबरेजवळ आल्या.तेव्हा कबरेवरून धोंड लोटलेली आहे असे त्यांना आढळले.त्या आत गेल्यावर त्यांना [प्रभू येशूचे] शरीर सापडले नाही.मग असे झाले की, त्याविषयी त्यांना भ्रांत पडली, तेव्हा पाहा, लखलखीत वस्त्रे परिधान केलेले दोन पुरुष त्यांच्याजवळ उभे राहिले. तेव्हा भयभीत होऊन त्यांनी आपली तोंडे जमिनीकडे केली असता ते त्यांना म्हणाले, "तुम्ही जिवंताचा शोध मेलेल्यांमध्ये का करता? तो येथे नाही, तर उठला आहे; तो गालीलात होता तेव्हाच त्याने तुम्हांला काय सांगितले ह्याची आठवण करा; ते

असे की, मनुष्याच्या पुत्राला पापी जनांच्या हाती धरून देण्यात यावे, त्याला वधस्तंभावर खळिण्यात यावे, व तसिऱ्या दविशी त्याने पुन्हा उठावे, ह्याचे अगत्य आहे." पृष्ठ ५

लूक २४:५०-५१ नंतर त्याने त्यांना बेथानीपर्यंत बाहेर नेले आणि हात वर करून त्यांना आशीर्वाद दलिा. मग असे झाले की, तो त्यांना आशीर्वाद देत असताना त्यांच्यापासून वेगळा झाला आणि वर स्वर्गात घेतला गेला. पृष्ठ ५

लूक ९:६० तो त्याला म्हणाला, "मेलेल्यांना आपल्या मेलेल्यांस पुरू दे; तू जाऊन देवाच्या राज्याची घोषणा कर." पृष्ठ ४०

स्तोत्र. १६:११ जीवनाचा मार्ग तू मला दाखवशील; तुझ्या सान्नध्यिात पूर्णानंद आहे; तुझ्या उजव्या हातात सौख्ये सदोदति आहेत. पृष्ठ २०

स्तोत्र. ४०:३ त्याने माझ्या मुखात नवे गीत, आमच्या देवाचे स्तोत्र घातले; हे पाहून पुष्कळ लोक भय धरतील व परमेश्वरावर भाव ठेवतील. पृष्ठ ३६

१ करथि. १५:२२ कारण जसे आदामामध्ये सर्व मरतात तसे ख्रसि्तामध्ये सर्व जविंत केले जातील; पृष्ठे १७ व २३

१ करथि. १५:४५-४६ त्याप्रमाणे असा शास्त्रलेख आहे की, "पहलिा मनुष्य आदाम जविंत प्राणी असा झाला;" शेवटला आदाम जविंत करणारा आत्मा असा झाला. तथापि जे आध्यात्मकि ते प्रथम नाही; प्राणमय ते प्रथम, मग जे आध्यात्मकि ते. पृष्ठ ६

१ करथि. १५:५७ परंतु जो देव आपल्या प्रभू येशू ख्रसि्ताच्या द्वारे आपल्याला जय देतो त्याची स्तुती असो. पृष्ठ ८

१ करथि. २:१६ "प्रभूचे मन असे कोणी ओळखले आहे की त्याने त्याला शकिवावे?" आपल्याला तर ख्रसि्ताचे मन आहे. पृष्ठ २२

१ करथि. ३:१६-१८ तुम्ही देवाचे मंदरि आहात आणि तुमच्यामध्ये देवाचा आत्मा वास करतो हे तुम्हांला ठाऊक नाही काय? जर कोणी देवाच्या मंदरिाचा नाश करतो तर देव त्याचा नाश करील; कारण देवाचे मंदरि पवति्र आहे, तेच तुम्ही आहात. कोणी स्वत:ला फसवून घेऊ नये; ह्या युगाच्या दृष्टीने आपण ज्ञानी आहोत असे जर तुमच्यापैकी कोणाला वाटत असेल तर त्याने ज्ञानी होण्याकरता मूर्ख व्हावे. पृष्ठे २४ व २५

१ करथि. ६:१७ परंतु जो प्रभूशी जडला तो व प्रभू एक आत्मा आहेत. पृष्ठे १५ व १६ व २४

१ करथि. ६:१९-२० तुमचे शरीर, तुमच्यामध्ये वसणारा जो पवति्र आत्मा देवापासून तुम्हांला मळिाला आहे त्याचे मंदरि आहे हे तुम्हांला ठाऊक नाही काय? आणि तुम्ही स्वतःचे मालक नाही; कारण तुम्ही मोलाने वकित घेतलेले आहात; म्हणून तुम्ही आपले शरीर [व आत्मा] जी देवाची आहेत त्याद्वारे देवाचा गौरव करा. पृष्ठ २५

१ तीमथ्य. २:३-४ हे आपला तारणारा देव ह्याच्या दृष्टीने चांगले व स्वीकारण्यास योग्य आहे. त्याची अशी इच्छा आहे की, सर्व माणसांचे तारण व्हावे व त्यांनी सत्याच्या परपिूर्ण ज्ञानाप्रत पोहचावे. पृष्ठ ४०

१ तीमथ्य. २:५-६ कारण एकच देव आहे, आणि देव व मानव ह्यांच्यामध्ये ख्रसि्त येशू हा मनुष्य एकच मध्यस्थ आहे. त्याने सर्वांसाठी मुक्तीचे मोल म्हणून स्वतःला दलिे ह्याची साक्ष यथाकाळी द्यायची आहे. पृष्ठे ८ व १२

१ थेस्सलनी. १:६-८ तुम्ही फार संकटात असताना पवति्र आत्म्याच्या आनंदाने वचन स्वीकारून आमचे व प्रभूचे अनुकरण करणारे झालात; अशाने मासेदोनयिा व अखया ह्यांतील सर्व वश्विास ठेवणारे ह्यांना तुम्ही आदर्श झालात. मासेदोनयिा व अखया ह्यांत तुमच्याकडून प्रभूच्या वचनाची घोषणा झाली आहे, इतकेच केवळ नव्हे तर देवावरील तुमच्या वश्विासाचे वर्तमानही सर्वत्र पसरले आहे; ह्यामुळे त्यावषियी आम्ही काही सांगायचे अगत्य नाही. पृष्ठ ३६

१ थेस्सलनी. ५:२३-२४ शांतीचा देव स्वत: तुम्हांला परपिूर्णपणे पवति्र करो; आणि आपला प्रभू येशू ख्रसि्त ह्याच्या आगमनसमयी तुमचा आत्मा, जीव व शरीर ही नर्दिोष अशी संपूर्णपणे राखली जावोत. तुम्हांला पाचारण करणारा वश्विसनीय आहे; तो हे करीलच. पृष्ठ २४ व २५

१ पेत्र. १:१८-१९ कारण वाडवडलिांच्या परंपरेने चालत आलेल्या तुमच्या नरिर्थक वागणुकीपासून, 'सोने व रुपे' अशा नाशवंत वस्तूंनी नव्हे, तर नषि्कलंक व नर्दिोष कोकरा असा जो ख्रसि्त, त्याच्या मूल्यवान रक्ताने 'तुम्ही मुक्त झाला आहात.' पृष्ठ २५

१ पेत्र. २:२४ 'त्याने स्वतः तुमची आमची पापे' स्वदेही 'वाहून' खांबावर 'नेली', ह्यासाठी की, आपण पापाला मेलेले होऊन सदाचरणासाठी जगावे. त्याला बसलेल्या 'माराने तुम्ही नरिोगी झाला आहात.' पृष्ठ ४

१ पेत्र. ३:१५ तर ख्रसि्ताला 'प्रभू' म्हणून आपल्या अंत:करणात 'पवति्र माना;' आणि तुमच्या ठायी जी आशा आहे तच्यिावषियी वचिारपूस करणाऱ्या प्रत्येकाला उत्तर देण्यास नेहमी सद्धि असा; तरी ते

सौम्यतेने व भीडस्तपणाने द्या; पृष्ठ ३६

१ पेत्र. ३:१८ कारण आपल्याला देवाजवळ नेण्यासाठी ख्रस्तिानेही पापांबद्दल, म्हणजे नीतमिान पुरुषाने अनीतमिान लोकांकरता, एकदा मरण सोसले. तो देहरूपात जवि मारला गेला आणि आत्म्यात जविंत केला गेला; पृष्ठ १२

१ योहान. १:७ पण जसा तो प्रकाशात आहे तसे जर आपण प्रकाशात चालत असलो तर आपली एकमेकांबरोबर सहभागति आहे, आणि त्याचा पुत्र येशू ख्रस्ति ह्याचे रक्त आपल्याला सर्व पापांपासून शुद्ध करते. पृष्ठ ४

१ योहान. १:९ जर आपण आपली पापे पदरी घेतली, तर तो वश्विसनीय व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अनीतीपासून शुद्ध करील. पृष्ठ २६

१ योहान. ३:१-३ आपल्याला देवाची मुले हे नाव मळािले ह्यात पत्यिाने आपल्याला केवढे प्रीतदिान दलिे आहे पाहा; आणि आपण तसे आहोतच. ह्यामुळे जग आपल्याला ओळखत नाही, कारण त्याने त्याला ओळखले नाही. प्रयिजनहो, आपण आता देवाची मुले आहोत; आणि पुढे आपण काय होऊ हे अजून प्रकट झालेले नाही; तरी तो प्रकट होईल तेव्हा आपण त्याच्यासारखे होऊ हे आपल्याला माहीत आहे, कारण जसा तो आहे तसाच तो आपल्याला दसिल. जो कोणी त्याच्यासंबंधाने ही आशा बाळगतो तो, जसा तो शुद्ध आहे, तसे आपणाला शुद्ध करतो. पृष्ठ २५

१ योहान. ३:९-१० जो कोणी देवापासून जन्मलेला आहे तो पाप करत नाही; कारण त्याचे बीज त्याच्यामध्ये राहते; त्याच्याने पाप करवत नाही, कारण तो देवापासून जन्मलेला आहे. ह्यावरून देवाची मुले व सैतानाची मुले उघड दसिून येतात. जो कोणी नीतीने वागत नाही तो देवाचा नाही, व जो आपल्या बंधूवर प्रीती करत नाही तोही नाही. पृष्ठ २५

१ योहान. ५:१२-१३ ज्याला तो पुत्र लाभला आहे त्याला जीवन लाभले आहे; ज्याला देवाचा पुत्र लाभला नाही त्याला जीवन लाभले नाही. देवाच्या पुत्राच्या नावावर वश्विास ठेवणाऱ्या तुम्हांला सार्वकालकि जीवन लाभले आहे हे तुम्हांला कळावे म्हणून मी हे तुम्हांला लहिलिे आहे. (आणि तुम्ही देवाच्या पुत्राच्या नावावर वश्विास ठेवीत राहावे). पृष्ठे १५ व १६

१ योहान. ५:१८-१९ जो कोणी देवापासून जन्मलेला आहे तो पाप करत नाही, हे आपल्याला ठाऊक आहे; जो देवापासून जन्मला तो (ख्रस्ति) त्याला सुरक्षति ठेवतो आणि त्या दुष्टाचा संपर्क त्याला होत नाही. आपण देवापासून आहोत हे आपल्याला ठाऊक आहे; सगळे जग त्या दुष्टाला वश झाले आहे. पृष्ठ १७

२ करथि. ५:१६-२१ तर मग आतापासून आम्ही कोणाला देहदृष्ट्या ओळखत नाही; आणि जरी आम्ही ख्रस्तिाला देहदृष्ट्या ओळखले होते तरी आता ह्यापुढे त्याला तसे ओळखत नाही. म्हणून जर कोणी ख्रस्तिाच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ती1 आहे; जुने ते होऊन गेले; पाहा, ते नवे झाले आहे.ही सगळी देवाची करणी आहे; त्याने स्वत:बरोबर आपला समेट येशू ख्रस्तिाच्या द्वारे केला आणि समेटाची सेवा आम्हांला दलिी; म्हणजे जगातील लोकांची पातके त्यांच्याकडे न मोजता, देव ख्रस्तिामध्ये स्वत:बरोबर जगाचा समेट करत होता; आणि त्याने आपल्याकडे समेटाचे वचन सोपवून दलिे.म्हणून देव आमच्याकडून वनिवत असल्यासारखे आम्ही ख्रस्तिाच्या वतीने वकलिी करतो; देवाबरोबर समेट केलेले असे तुम्ही व्हा, अशी आम्ही ख्रस्तिाच्या वतीने वनिंती करतो. ज्याला पाप ठाऊक नव्हते त्याला त्याने तुमच्या-आमच्याकरता पाप असे केले; ह्यासाठी की, आपण त्याच्या ठायी देवाचे नीतमित्त्व असे व्हावे. पृष्ठ २५

२ करथि. ५:१७ म्हणून जर कोणी ख्रस्तिाच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ती आहे; जुने ते होऊन गेले; पाहा, ते नवे झाले आहे. पृष्ठ २०

२ करथि. ५:१८ ही सगळी देवाची करणी आहे; त्याने स्वत:बरोबर आपला समेट येशू ख्रस्तिाच्या द्वारे केला आणि समेटाची सेवा आम्हाला दलिी; पृष्ठ ८

२ तीमथ्य. १:७ कारण देवाने आपल्याला भत्तिरेपणाचा नव्हे, तर सामर्थ्याचा, प्रीतीचा व संयमनाचा आत्मा दलिा आहे. पृष्ठ २१

## Additional Resources that can be purchased on Amazon or Christian book stores.

- The Rest of the Gospel, Dan Stone and David Gregory
- Classic Christianity, Bob George
- Handbook to Happiness, Charles Solomon
- Ins and Out of Rejection, Charles Solomon
- Lifetime Guarantee, Bill Gillham
- The Normal Christian Life, Watchman Nee
- Sit Walk Stand, Watchman Nee
- Release of the Spirit, Watchman Nee
- Birthright, David Needham
- The True Vine, Andrew Murray
- Abide in Christ, Andrew Murray
- Absolute Surrender, Andrew Murray
- Victory in Christ, Charles Trumbull
- The Key to Triumphant Living, Jack Taylor
- The Saving Life of Christ, W. Ian Thomas
- The Gift of Forgiveness, Charles Stanley
- The Blessing of Brokenness, Charles Stanley
- Adversity, Charles Stanley
- Truefaced, John Lynch
- My Utmost for His Highest (Devotional), Oswald Chambers
- Forgiven Forever, Bob George
- The Grace Awakening, Charles Swindoll
- The Sufficiency of Christ, John MacArther
- Hudson Taylor's Spiritual Secret, Dr. and Mrs. Howard Taylor
- Weekly e-devotional GraceNotes, John Woodward. Available through www.GraceNotebook.com
- For Me to Live is Christ, Group study course, Charles Solomon
- The Cross, Your Victory Today, CD Series by Dr. Charles Stanley (and many other sermons by Dr. Stanley)
- The Shackling of Grace, Lee LeFebre
- The Exchanged Life Conference, CD Series by Lee LeFebre
- Free at Last, Tony Evans
- Dr. Tony Evans (most sermons)
- Gregory Dickow (most sermons)
- Romans: Chapters 5-8, Any Version of the Bible
- www.gracefellowshipintl.com
- www.thelifebookstore.com
- Seeking God through Prayer & Meditation, David Howell
- Fully Alive and Finally Free, David Howell

Place Stamp Here

Prison Evangelism, Inc.
PO Box 571977 Houston,
Texas 77257

72019




मला अधिक जाणून घ्यायचे आहे. कृपया “प्रार्थना व मनन ह्याद्वारे देवाचा शोध घेणे” ची एक विनामूल्य प्रत पाठवा.

नाव ____________________

पत्ता ____________________

शहर,राज्य,पिन कोड ____________________

____________________

कृपया «देवाचे मूल कसे व्हावे?» याबद्दल तुम्ही काय विचार करता ते आम्हाला सांगा. ____________________

____________________

____________________

____________________

____________________

____________________

____________________

____________________

____________________

____________________

Prison Evangelism, Inc. PO Box 571977 Houston Texas 77257

# देवाचे मूल
# कसे व्हावे



मी ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळलेला आहे; आणि ह्यापुढे मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्या ठायी जगतो; आणि आता देहामध्ये जे माझे जीवित आहे ते देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे; त्याने माझ्यावर प्रीती केली व स्वत:ला माझ्याकरता दिले. गलती. २:२०

या सचित्र साध्या सत्यांचा अनुभव घ्या आणि देवावरील विश्वास व भरवशामुळे परिपूर्ण, विपुल आणि विजयी जीवन कसे मिळू शकते हे शिका.

हे पुस्तक कसे वापरावे?

- देवाबरोबर शांतीचा मार्ग आणि मार्गदर्शक म्हणून
- तारणाचा अनुभव समजून घेण्यासाठी एक साधन म्हणून
- वैयक्तिक किंवा गट बायबल अभ्यास करण्यासाठी (पवित्र शास्त्रातील २२३ वचने दिली आहेत)
- ३० – दिवसासाठी उपासना आणि मनन मार्गदर्शिका म्हणून स्पष्टीकरण आणि बायबलमधील वचनांचा वापर करून

लेखक डेव्हिड हॉवेल हे देवाचे नव्याने जन्मलेले मुल आहेत. या पुस्तकातील माहिती अनुभवाची, सामर्थ्याची आणि आशेचे सार प्रतिबिंबित करते जी येशू ख्रिस्ताने त्यांना अनेक वर्षांच्या आत्मकेंद्रित आणि आत्मशोषणाचे जीवन जगल्यानंतर दिली आहे. स्पष्टीकरण, वचने आणि मजकूर यांच्या माध्यमातून; येशू ख्रिस्तावरील विश्वास आणि तारणाच्या आलेल्या अनुभवामुळे या पृथ्वीवर देवासह विजयाचे, विपुलतेचे व शांतीचे जीवन जगले जाऊ शकते हे हॉवेल दाखवून देतात.

ISBN 978-0-578-14157-2
90000>
9 780578 141572